# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| कार्यकारी संपादक | : | श्री. मोहन पाठक |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००२ |
| वर्ष | : | दुसरे |
| अंक | : | ३ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ५४**

MAHMAR/ 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष दुसरे / अंक ३ / फेब्रुवारी २००२

## संपादकीय

### वेगवान बदलांचे व्यवस्थापन - एक यक्षप्रश्न

दुसरं महायुध्द, हिरोहिमा नागासकीवरील बॉम्ब हल्ले, संपूर्ण जगात वाढलेली यांत्रिकता या सर्वांचा परिपाक होऊन जीवनात जीवघेणी गती निर्माण झाली. एका विलक्षण गतीने सर्व जगाला व्यापून टाकलं. या गती मुळे पूर्वी जे बदल पचनी पडण्यासाठी समाजाला थांबाव लागायचं, विचार करावा लागायचा तो विचार करण्याची उसंतच मिळेनाशी झाली. जीवनाचं प्रत्येक क्षेत्र झपाट्याने बदललं. सरडा रंग बदलतो तितक्या सहजतेने जग बदलायला लागलं. जुन्या 'शम्मी कपूर' ची भूमिका असणाऱ्या 'राजकुमार' या चित्रपटात वेगळ्या संदर्भात आलेल्या गीताच्या ओळी आज वेगळ्या अर्थानं मनात घोळायला लागल्या.

"इस रंग बदलती दुनिया में, इन्सान की नियत ठीक नहीं" या त्या गीताच्या ओळीतील माणसाची नियत खरोखरच कशी आहे, कशी बदलत चालली आहे ते पाहून अवाक मात्र व्हायला होते. लहान लहान मुलांपासून ते म्हाताऱ्या कोताऱ्यापर्यंत सर्वांनाच या बदलाचा वेग सतत जाणवतो आहे. इंटरनेट क्रांतीमुळे तर, 'काही खरं नाही..' असं वाटेल अशी परिस्थिती आहे. प्रत्येक दिवसाला बदल आहे. काल शिकलेलं मोठ्या कष्टाने आत्मसात केलेलं, आज कालबाह्य ठरत आहे. तंत्रज्ञानाचा रेटा इतका जोरदार आहे की भविष्याबद्दल बोलण, अंदाज बांधणंही कठीण आहे. प्रत्येकाची जीवनाबद्दलची, जीवनाच्या श्रेयसाबद्दलची जाणीव बदलत चालली आहे. कालपर्यंत आदर्श मानलेली कित्येक मूल्ये, जी आपण जीवन सर्वस्व मानीत होतो, आज बाराच्या भावात, निकालात

निघताना आपणच पाहतो आहोत. चिरंतन मूल्ये असतात, ती असावी लागतात हेच बहुदा येत्या दहावीस वर्षांत पार पुसले जाईल.

बदल अपरिहार्य असतो. सृष्टीचा तसा नियमच आहे. प्रश्न आहे तो गतीचा ! बरे या अनेकानेक बदलांचा व व्यक्ती म्हणून आपला संबंध काय ? तुम्ही तक्रार करा, तक्रार करू नका, तुमच्या मर्जीला किंमत शून्य ! एका सुंदर प्रार्थनेतील काही ओळी आठवतात, " हे परमेश्वरा, जी परिस्थिती मी बदलू शकत नाही. तिला सामोरे जाण्याचे धैर्य मला दे." सामाजिक बदलाबाबत माणूस असा नियतीशरण असतो, परिस्थिती शरण असतो.त्याला तसं असावंच लागत. डार्विनचा सिध्दांत म्हणूनच फार महत्त्वाचा आहे. " जे लायक असतात तेच जीवन जगू शकतात. नालायक ठरणारांना संपावंच लागते. जीवन जगण्याच्या स्पर्धेत हे बदल स्वीकारून जे स्वतःला लायक ठरवतात तेच जगतात. जे हे बदल पचवू शकत नाहीत, ज्यांना बदलामधील ही गती अगम्य असते त्यांना श्वासाचं अंतर पार करून संपावं लागतं. माणसं म्हातारी झाली की ती अशी बदल स्वीकारू शकत नाहीत. निसर्ग मात्र बदलतच रहतो.

क्षितिज तेच असतं, सूर्यही तोच असतो, पण प्रत्येक दिवसाचा सूर्योदय नवा असतो, वेगळा असतो. बालकवींची औदुंबर ही कविता पहा. ही कविता वाचणारे डोळे तेच असतात, वाचक तोच असतो व कविताही तीच असते. पण अर्थाच्या जाणीवा मात्र आमूलाग्र बदललेल्या असतात. त्याला परिपक्वता म्हणा की आणखी काही... ! लहानपणी औदुंबर वाचली तेव्हा डोळ्यासमोर एक सुरेखसं निसर्गचित्र उभ राहिलं होतं. कॉलेजच्या दिवसात, त्या कवितेच्या वयात त्या चित्रातलं वेगळंच सौंदर्य मनात उलगडत गेलं आणि अचानकच जगात पाय टाकून बसणारा तो औदुंबर अध्यात्मिक सौंदर्याची जाणीव करून द्यायला लागला. दुर्गा भागवतांच्या 'ऋतुचक्र' मध्ये प्रत्येक ऋतुचं येणं जाणं सृष्टीच्या, निसर्गाच्या काव्यात्म बदलाला रेखांकित करतं, शब्दांकित करतं. हे बदल काव्यात्म असतात. त्यात घाई नसणे, अगम्य आहे असा सुसाट वेग नसतो.

पण असा वेग इतर सर्व स्तरांवर जाणवतो तेव्हा मन संभ्रमित होतं, हे बदल चांगले का वाईट हे कसं ठरवायच ? पाहणाराच्या दृष्टिकोणाचा प्रश्न असतो. सामाजिक संदर्भात मात्र या बदलांची किंमत चुकवावीच लागते, परिणाम भोगावे लागतात. आज शहरीकरण इतकं वाढलं आहे की गेल्या शतकातलं ते आश्चर्यच मानलं जातं. शंभर वर्षापूर्वी जगाच्या त्यावेळच्या एकूण लोखसंख्येच्या जेमतेम दहा टक्के लोक शहरात रहात. आज २००० खाली खेडी रीकामी पडतील अशी स्थिती आहे. सुमारे ५० % लोक आज शहरांतून रहातात. एक कोटीच्या वर लोकसंख्या गेलेल्या मुंबईत अनंत चतुर्दशीच्या दिवशी एक लाखाहून अधिक गणेश मूर्ती विसर्जित होतात. या बदलाची किंमत आपण देत आहोत. जीवनातील बकालपणा, भकासपणा कमालीचा वाढला आहे. रोग आणि रुग्ण यांची संख्या वाढली आहे. सरासरी आयुष्यमान वाढले व वाढत्या लोखसंख्येने प्रश्नांचे नवे डोंगर उभे केले.

या बदलांचे व्यवस्थापन कसे करायचे हा यक्षप्रश्न माणसा समोर उभा राहिला !

***




वर्ष दुसरे / अंक ३ / फेब्रुवारी २००२

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

**सहसंपादक**
सौ. मंजिरी दांडेकर

**सहाय्यक मंडळ**
सौ. भारती जोशी
सौ. विशाखा देशपांडे
कु. दीपाली भाटकर

कायदेविषयक सल्लागार
ॲड. सलिल बुटाला

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : ५४२ ६२ ७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्ट्स,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : ५३४ १२ ९१

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | एक होता कार्व्हर | प्रा. विद्याधर वालावलकर | ३ |
| २) | एक होता कार्व्हर | केतन कांबळे | ५ |
| ३) | ठाणे- भारतीय लोहमार्गावरील पहिले स्थानक | हरिभाऊ शेजवळ | ८ |
| ४) | मी कलेचा विश्वस्त आहे मालक नव्हे ! | नीलेश गोरे | ११ |
| ५) | स्टुडंटस् एनसायक्लोपीडीया ब्रिटानिका (इंडिया) -ज्ञानाचा खजिना | सौ. वनिता नामदेव कदम | १४ |
| ६) | वाढदिवस | सौ. वंदना प्रसादे | १६ |
| ७) | इंधन वाचविण्यासाठी : भाग २ | श्री. वि. ना. कोपरकर | १७ |
| ८) | ढासळते पर्यावरण | आदित्य फडके | २३ |
| ९) | घरातच सिद्धिविनायक | विश्वनाथ शेंड्ये | २७ |
| १०) | मृत्यूशय्येवर असणाऱ्या कॅन्सर रुग्णांची सेवा करणारे सिप्ला कर्करोग परिहार सेवा केंद्र | सुरेश. श. देशपांडे | २८ |
| ११) | सदाचरण म्हणजेच खरा मानवधर्म | गो. रा. जोशी | ३१ |
| १२) | कॉलेज डे | भालचंद्र रा. गोखले | ३५ |
| १३) | परिसर वार्ता | प्रा. मोहन पाठक | ३७ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# एक होता कार्व्हर

"एक होता कार्व्हर" या पुस्तकावर योगायोगाने दोन लेख आले. केतनला दिशासाठी सौ. वीणा गवाणकर यांची मुलाखत घ्यायला पाठवले त्याचवेळी प्रा. वालावलकरांचा हा लेख मिळाला. दोन्ही लेखांचा एकत्र समावेश करीत आहेत. - संपादक

बीजांकुराच्या रुपातील छोटा 'जॉर्ज' आणि वैज्ञानिकाच्या रुपातील त्याचा वटवृक्ष अशा प्रतिकात्मक 'मुखपृष्ठाने' आपण सहजपणे आकर्षित होतो. आणि मग त्या पुस्तकाच्या वाचनाचा परिसस्पर्श आपले जीवन चक्क झळकाळून टाकतो. "माझ्याकडे अमुकतमुक नाही म्हणून नाहीतर मी एवढे केले असते" अशा वल्गना मारणाऱ्यांचे शब्दच संपून जावेत असं अवाक करणारे हे व्यक्तिमत्त्व 'जॉर्ज कार्व्हर'. आजही आपल्या आसपास संधी मिळत नाही, नोकरी नाही, बेकारी, भांडवल नाही... असे रुदन करताना जे अनेक तरुण दिसतात त्यांना हे पुस्तक अवश्य भेट द्यावे.

शिक्षणाच्या संधी नाकारल्या गेल्या म्हणून ! असे सहजोद्गार काढून शिक्षित समाजातील 'प्राविण्य' मिळवणाऱ्यांवर शाब्दिक कुरघोडी करणाऱ्या विशेषत: आजच्या समाजातील प्रगतीच्या संधीच नाहीशा झाल्या आहेत म्हणून चुकीचा मार्ग पकडणाऱ्या अथवा आत्महत्या करणाऱ्या तरुणाईच्या नित्यवाचनात हे पुस्तक असायला हवे.

निसर्गदत्त जीवनाच्या जवळ पोहोचणाऱ्यालाच निसर्गाची गुपिते कळतात असं म्हणतात. मेरीच्या ह्या मुक्या पोराचे वर्णन करताना असं म्हटलंय, "तो झाडा-प्राण्यांच्या संगतीत रमे, मनसोक्त गुणगुणत राही. अगदी भान विसरून! पोटावर पालथं पडून तासन्-तास एखादया अंकुराचे किंवा वाळवीचे निरीक्षण करीत राही. त्याच्या ह्या दोस्तांच्या सहवासातून त्याला अनेक गोष्टी समजत. त्यांची दुखणी-खुपणी आजारपणं कळत. त्यांच्या सहवासात झाडांना जणू जिव्हा फुटतं, कान येत. आपल्या भाषेत त्यांची बोलणी चालत... तोही मग एक बालत-बोलत झाड बनं"

सुंदर आणि सचित्र मांडणी, जिवंत ओघवती भाषा, सरळसाधी वाचणाऱ्याच्या मनाला स्पर्श करणारी. सहजपणे केलेले विधानही सरळ वाचून समजून पुढे जाण्यासारखे... अनेकदा थांबून पुन्हा-पुन्हा विचार करण्यासारखे.

दहाव्या वर्षी घर सोडून शिक्षणासाठी दुसऱ्या शहरात जाणे. तिथल्या कडक्याच्या थंडीमध्ये स्वत:चे अस्तित्व टिकवणे... ह्या सर्व गोष्टी असामान्यच आहेत. या प्रवासात भेटलेली माणसेही असामान्य आहेत. या 'निग्रो' मुलावरही मायेचा प्रेमाचा वर्षाव व मदतीचा हात पुढे करणारे हे सर्व जण परमेश्वराचे दूतच म्हणायला हवेत.

त्याच्या ह्या बालपणातील प्रवासामध्ये त्याला काळा वा 'निग्रो' म्हणून मिळालेली वाईट वागणूक, त्याच्या समोरच एका निग्रोचा तथाकथित उच्च समाजाने आगीत टाकून घडविलेला मृत्यू... आणि हायलंड विद्यापीठात प्रवेश घेताना गुणवत्तेनुसार मिळालेला प्रवेश, केवळ 'निग्रो', असल्याने नाकारला जाणे. या सर्व आघातांनी कोसळून न जाता आपल्या ध्येयप्राप्तीसाठी अखंड परिश्रम करण्याची प्रेरणा देणारा 'डॉ. कार्व्हर' हा श्रेष्ठच पुरुष होता.

श्रेष्ठ व्यक्तींचे श्रेष्ठत्व अत्यंत छोट्या छोट्या गोष्टींतूनही दिसते कारण छोट्यात छोटी गोष्टही अत्यंत महत्त्वाची असल्याप्रमाणेच ते वागत असतात.

वसतिगृहातील भोजनगृह चालविताना त्याने एक नवाच खेळ सुरु केला. त्या खेळामुळे भोजनगृहाला एक चिरंतन संस्थेचे महत्त्व प्राप्त झाले आहे. तो खेळ म्हणजे वाढल्या जाणाऱ्या किंवा हव्या असणाऱ्या पदार्थांची मागणी करताना शास्त्रीय पारिभाषिक संज्ञाच वापरायच्या, तरच तो पदार्थ वाढला जाईल. उदाहरणार्थ साखर हवी असेल $C_{12}H_{22}O_{11}$, बटाटा हवा असेल तर सोलीनम ट्यूबरोझम इ. शास्त्रीय पारिभाषिक संज्ञा माहीत नसणाऱ्या नवीन विद्यार्थ्यांची अडचण होई. मग ते बिचारे उपासमार टाळण्यासाठी जॉर्जकडे धाव घेत. जॉर्जच्या शेजारची खुर्ची मिळविण्यासाठी प्रत्येकाची धावपळ उडे. कारण जॉर्जमहाशय या संज्ञाचे चालते-बोलते ग्रंथकोशच !

डॉ. बुकर टी वॉशिंग्टन यांनी 'टस्कगी' च्या शाळेची निर्मिती केली. या कर्मयोग्याने कष्टाने उभ्या केलेल्या शैक्षणिक सुविधांमधून हजारो विद्यार्थी शिक्षण घेऊ लागले. त्याचवेळी अॅलाबामातील जंगलतोड, रासायनिक खतांचा अतिवापर व नगदी पिकांच्या भडीमाराने जमिनीचा कसच नाहीसा झाला तेव्हा त्यांनी जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर यांना एक पत्र लिहिले.

...मी तुम्हाला पैशाचे, उच्च पदाचे वा कीर्तीचेही आमिष दाखवू शकत नाही. पहिल्या दोन गोष्टी तुम्ही उपभोगात आहात. शेवटची तुम्ही कोठेही मिळवू शकाल यात शंका नाही. मी तुम्हाला या गोष्टी सोडायला सांगत आहे ; त्यांच्याकडे पाठ फिरवायला विनवीत आहे. त्याच्या बदल्यात मी तुमच्यावर काम, अविरत कष्ट आणि शतकानुशकत दारिद्र्याने गांजलेल्या, गुलामीच्या चिखलात रुतलेल्या दलितांना उद्धरुन त्यांना 'सुजाण मानव' बनविण्याची कामगिरी सोपवत आहे.

आयोवा स्टेट या मानाच्या कॉलेजमधील अॅग्रीकल्चरल व बॅक्टेरीअल बॉटनीचा प्राध्यापक म्हणून काम करणाऱ्या या तरुण निग्रो तज्ज्ञाने पत्र पूर्ण वाचून काढल्यावर खिशातून डायरी काढली व डायरीच्या रिकाम्या पानावर लिहिले, 'मी येत आहे' खाली सही, बस. तारीख नाही वार नाही, प्रश्न नाही, शंका नाही.

हे पुस्तक पुन्हा-पुन्हा वाचताना जाणवणारा अर्थ जीवनाकडे पहाण्याचा आपला दृष्टिकोन समृद्ध करतो. रसायनशास्त्र, जीवशास्त्र, वनस्पतिशास्त्र, विज्ञान प्रत्येक जण शिकतो परंतु त्या शिकवण्यातून परिसर वाचन व त्यातून सृजन असा हा वैज्ञानिक प्रत्येक पान हृदयावर कोरुन ठेवण्यात यशस्वी होतो. त्यांनी काय केले असं विचारण्यापेक्षा त्यांनी काय केले नाही असं विचारल्यास उत्तर देणे सोपे होईल. कारण आपल्या कल्पनेपेक्षाही अद्भुत असं काहीतरी त्यांनी करून दाखविले. पृथ्वीवरील मानवाच्या निर्मितीचे काम करताना ब्रम्हदेवाची जी भूमिका होती तिच भूमिका जॉर्ज कार्व्हर यांची या कामात राहिली...

त्यांनी संशोधनातून, शिक्षणातून, निरीक्षणातून त्या प्रदेशाचा चेहराच बदलून टाकला. आपण हे पुस्तक अवश्य वाचावे, अगदी विकत घेऊन वाचावे, आवडेलच! अन्य कोणालातरी हे पुस्तक भेट म्हणूनही द्यावे.

जर कोणाला माणुस बनविणाऱ्याचा अभ्यासक्रम बनवायचा असेल तर त्या पाठ्यक्रमातील अत्यंत महत्त्वाचे पुस्तक म्हणून या पुस्तकाचा समावेश व्हावा एवढी या पुस्तकाची महती आहे.

या पुस्तकाची ही १८ वी डिलक्स आवृत्ती असली तरीही ती सर्वांग सुंदर झाली आहे अगदी आपल्या घरातील 'मॉड' पिढीलाही आकर्षक वाटेल अशी.

प्रा. विद्याधर वालावलकर
रवि उदय सोसायटी,
ठाणे (प.)

# एक होता कार्व्हर

*"एक होता कार्व्हर" या पुस्तकाची १८ वी आवृत्ती दि. २२-१२-२००१ रोजी सुप्रसिद्ध कवी मंगेश पाडगांवकर यांच्या हस्ते प्रकाशित झाली. या निमित्त वांदोडकर महाविद्यालयाचा केतन कांवळे याने सौ. वीणा गवाणकर यांची मुलाखत घेतली. त्याचा वृत्तांत पुढील प्रमाणे. - संपादक*



**केतन** : आपल्याला आपल्या पुस्तकाच्या १८ व्या आवृत्ती नंतर कसे वाटते ?

**लेखिका** : खरं तरं मी हे पुस्तक माझ्या मुलांसाठी लिहिण्यास सुरु केले. एखादी कथा लिहायची आणि मुलांना ती सांगायची. परंतु नंतर अनेकांनी हे लिखाण वाचले आणि ह्या कथांचे पुस्तकात रुपांतर करण्याचे सुचविले. वयाच्या ३८ व्या वर्षी हा प्रवास सुरु झाला. बघता-बघता २० वर्षे गेली आणि आज याची १८ आवृत्ती निघत आहे. याचं मलाच फार मोठं आश्चर्य वाटतं आहे. आणि जोडीने आनंद आहेच.

**केतन** : आपलं पुस्तक एवढे प्रसिद्ध झाले, याचे रहस्य काय ?

**लेखिका** : कदाचित माझी स्वत:ची लिहिण्याची वेगळी पद्धत, मी जास्त सनावळी मध्ये शिरले नाही. तसं केल असत तर कदाचित माझ पुस्तक अभ्यासाचं पुस्तक वाटलं असंत. मुलं कंटाळली असती, या पेक्षा मी पुस्तकात हे जास्त लिहिण्याचा प्रयत्न केला की, कार्व्हर कसा घडला? का घडला ? त्या मागची कारणं काय ? त्याची साधी राहाणी, त्याचा त्यागी स्वभाव हे लोकांना जास्त आकर्षक वाटलं, त्यांना ते आवडलं आणि म्हणून त्यांनी ते स्वीकारलं. दुसरं म्हणजे पुस्तकाची साधी भाषा, छोटी छोटी वाक्ये यामुळे मुलांमध्येही खूप प्रसिद्धी प्राप्त झाली.

**केतन** : मुलांवरती संस्कार व्हावेत म्हणून ह्या पुस्तकाची सुरुवात झाली. पण जो हे पुस्तक वाचेल, त्याच्यावर आपोआप संस्कार घडून येतात. याबद्दल आपणास काय वाटते ?

**लेखिका** : आज माझी मुले खूप शिकलीत. त्यात आश्चर्य काय ? ती चांगल्या सुशिक्षित घरातून आहेत. परंतु ज्यावेळेस मला पत्रातून हे कळतं की, माझं पुस्तक वाचून त्या पुस्तकातून प्रेरणा घेवून एका कामवालीचा मुलगा किंवा एखाद्या प्युनचा मुलगा चांगला शिकतोय तेव्हा ह्या पुस्तकाचे सार्थक झाल्यासारखे वाटते. पुस्तके वाचून कोणी आळस सोडतं, कोणी व्यसन सोडतं, कोणी होकारार्थी विचार करायला शिकतं तर कोणी चक्क शारीरिक व्यंगावर मात करतो, हे ज्यावेळेस कळतं तेव्हा फार आनंद होतो. एक वेगळी शांतता मिळते.

**केतन** : १८ व्या आवृत्तीत आपण काय बदल केलाय ?

**लेखिका** : मूलतः आवृत्ती हा शब्दच मला चुकीचा वाटतो. १८ व्या आवृत्ती पेक्षा १८ वी रिप्रिन्ट म्हणणं मला जास्त आवडेल. बदलाचं विचारलत तर कागदाची क्वॉलिटी चांगली वापरली आहे. कार्व्हरांचे फोटो आहेत आणि काही कल्पनाचित्रे आहेत. कल्पना चित्रे यासाठी की, खेड्यातल्या मुलांना निग्रो कसे असतात, त्यांची घरे कशी असतात, हे स्पष्ट होते. यंदा तर १५,००० पुस्तकांचे बुकींग झाले आहे. कदाचित मराठी साहित्यातील हा विक्रम असावा.

**केतन** : आपणांस व्यक्ती चित्रण लिहिण्यात जास्त रुची का आहे ?

**लेखिका** : चरित्र, लिहिण्यापेक्षा पहिल्यांदा चरित्र वाचण्यास फार आवडे. एखादी व्यक्ती कशी घडते ? तशी का घडते ? कुठल्या गोष्टी कारणीभूत झाल्या असाव्यात, या खोलात जायला आवडते. ही कल्पना नव्हे हे एक सत्य आहे. ते सत्य फार आवडते आणि अशा व्यक्तींवरती लिहिणे तर फार आवडतं, जे एका गोष्टीवर ४०-५० वर्षे काम करतात.

**केतन** : आपण आपलं यश कसं व्यक्त कराल ?

**लेखिका** : "माझी आवड ही सर्वांची आवड" हेच माझं यश. माझी लिहिण्याची पध्दत, मांडणी लोकांपर्यंत पोचते आहे. त्या मूळ लोकांमध्ये चांगले बदल घडून येतात, हेही माझं यश आणि दुसरं म्हणजे मी एक कला शाखेची विद्यार्थिनी. परंतु कार्व्हर, सालीम अली म्हणजे वनस्पती शास्त्र, पक्षीशास्त्र हेही वाचावंच लागतं की, कलेची विद्यार्थीनी असून या विज्ञान शाखेची माहिती मिळणे ही एक मिळकतच नाही का ?

**केतन** : आपल्या यशामागे आपल्या परिवाराचा आणि मित्र वर्गाचा कसा पाठिंबा होता?

**लेखिका** : कोणत्याही प्रकारचा त्रास नाही, विरोध नाही, पूर्ण पाठिंबा होता.

**केतन** : आजची स्त्री विचार करते की, "घराच्या बाहेर पाऊल टाकलं तरचं मी यशस्वी." परंतु आपण घरात राहून हे यश प्राप्त केलंत याबाबत आपल्याला काय वाटते?

**लेखिका** : पहिल्यांदा तर माझं यश घरी बसून शक्य नाहीए. पुस्तक लिहिताना मला अनेक पुस्तके वाचावी लागली. मुंबईच्या ग्रंथालयात जावे लागले. म्हणजे घराच्या बाहेर जावे लागलेच. स्त्रीचं यश घराच्या बाहेर जाण्यावर किंवा घरात बसण्यावर अवलंबून नाही, तर ते तिला काय करायचे आहे, ह्यावर अवलंबून आहे. स्त्रीने कधी असा विचार मनात आणू नये की, पुरुष करतो म्हणजे मी हे करेन. तिचा नेहमी असा विचार असावा, अमूक गोष्ट मला करावयाची आहे आणि मी ती करणारच. परंतु इथे तिच्या परिवाराने तिला साथ द्यायला हवी आहे आणि समाजानेही हा बदल स्वीकारला पाहिजे.

**केतन** : डॉ. कार्व्हर आणि डॉ. आणि डॉ. आंबेडकर यांच्यात आपल्याला काय साम्य किंवा फरक जाणवतो ?

**लेखिका** : दोघेही आपल्या समाजासाठी झटले, लढले. आपला समाज सुधारण्याचा प्रयत्न केला. आपल्या समाजासाठी त्याग केला. दोघांचा उद्देश एकचं. "आपला समाज वर आणणे." परंतु मार्ग वेगळे. कार्व्हरांनी शिक्षण-संस्थांच्या मदतीने, स्वतः शिक्षण देवून आपल्या समाजाचा उद्धार केला, तर आंबेडकरांनी राजकीय शस्त्र वापरून आपला समाज उन्नत केला हा त्यांच्यातला फरक.

**केतन** : आपण आधीचा आणि नंतरचा निग्रो समाज आणि दलित समाज याची तुलना कशी कराल ?

**लेखिका** : आधी तर निग्रो आणि दलित समाज यांची स्थिती एकच. परंतु कमीत कमी भारतात दलित समाजात कुटुंब व्यवस्था तरी होती. परंतु निग्रो तर चक्क गुलाम म्हणून

विकला जाई. आज हे दोन्ही समाज सुधारलेत, वर येण्याचा प्रयत्न करत आहे, परंतु लोकांच्या मनामध्ये अजूनही कुठे तरी कमीपणा आहेच. कदाचित यामुळे पहिला अत्याचार हा निग्रो आणि दलित समाजावरच होतो. भारतातला दलित समाज खूप पुढे येतो आहे. त्याचे चमकते उदाहरण म्हणजे भारताचे राष्ट्रपती श्री. के. आर नारायणन् आणि मुंबई विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. मुणगेकर हेही मागासवर्गीय.

**केतन** : डॉ. कार्व्हर हे आपले आदर्श आहेत का ? भारतातील आणखी अशी कुठली व्यक्ती आहे जी कार्व्हरांप्रमाणे आपल्याला आदर्श आहे ?

**लेखिका** : आमची पिढी जरा गांधीवादी विचारांचीच. त्यामुळे कार्व्हर हे माझे आदर्श ठरलेच आणि भारतातील म्हटलं तर 'खानकोजे' हे माझे जबरदस्त आदर्श. हे मी त्यांच्या पुस्तकात लिहिले आहे.

**केतन** : या पुस्तकाशी निगडित कुठली अविस्मरणीय आठवण ?

**लेखिका** : तशा आठवणी तर खूप आहेत. पण अविस्मरणीय म्हणाल तर जळगावचे एक 'प्राध्यापक'. त्यांच्या पत्नीला स्मृतिभ्रंश झाला होता. तिला नव्याने कप, पेन या गोष्टींची आठवण करून द्यावी लागे. त्यांना बोलता येत नव्हते. हळूहळू त्यांना त्यांच नावं, त्यांचा टेलिफोन नंबर, चेकबुक नंबर विचारला जाई. त्या लिहून दाखवीत. त्यांना विचारले तुझं आवडतं पुस्तक कोणते ? तेव्हा त्यांनी लिहिले. 'एक होता कार्व्हर' !

**केतन** : या पुस्तकामध्ये, पुस्तक जसजसे, वाचत जावे तस तसे वाचनात थोडा थोडा बदल जाणवतो. असे का ?

**लेखिका** : होय आधीचा भाग मुलांसाठी आहे, परंतु नंतर ते अभ्यासाचे विषय, कार्व्हरचे यश हा जरा प्रौढांचा विषय होतो. हाच बदल आहे.

**केतन** : हे पुस्तक दुसऱ्या कुठल्या भाषांमध्ये भाषांतरित झाले आहे का ?

**लेखिका** : होय. हे पुस्तक हिंदीत संध्या भाटलेकर यांनी भाषांतर केले आहे तर गुजरातीमध्ये श्री. श्रीकांत काटदरे यांनी भाषांतर केले आहे.


**केतन** : सध्या आपण दुसऱ्या कुठल्या पुस्तकावर लिखाण करीत आहांत का ?

**लेखिका** : अजिबात नाही. सध्या या १८ व्या आवृत्तीच्या गोंधळात वेळचं नाही.

**केतन** : आताच्या युवा पिढीला आपला संदेश काय?

**लेखिका** : प्रत्येक गोष्ट मिळत नाही. खूपशा गोष्टी घडवाव्या लागतात. त्या गोष्टी घडवा आणि पुढे या. आयुष्यात कोणीतरी मोठे व्हा. आपल्या समोर चांगले आदर्श ठेवा आणि दुसऱ्याचे आदर्श बना.

मुलाखत - केतन कांबळे
मार्गदर्शन - प्रा. उषा तांबे



# ठाणे -भारतीय लोहमार्गावरील पहिले स्थानक

*भारतीय लोहमार्गांचा इतिहास म्हटला की 'ठाणे' हे नाव अपरिहार्य आहे. १६ एप्रिल १८५३ च्या त्या इतिहासाबद्दल.*
*- संपादक*

## पूर्वेतिहास

'मुंबई-ठाणे' हा २१ मैलाचा लोहमार्ग भारतीय नव्हे तर संपूर्ण आशियामधील पहिला प्रवासी व वाहतूक लोहमार्ग आहे. ही ठाण्याला असलेली एक अभिमानाची गोष्ट आहे. ज्यावेळी घोडा हेच प्रवासाचे जलद असे खुष्कीचे वाहन होते. त्यावेळी लोहमार्ग हा एक क्रांतिकारी शोध होता. या पार्श्वभूमीवर 'ठाणे-पहिल्या लोहमार्गावरील अंतिमस्थानक (Terminus) हा निःसंशयपणे इतिहास ठरतो. आणि याविषयी निगडित सर्व वस्तू , कागदपत्रे, पुरावे, माहिती हे संग्राह्य ठरतात.

बरोबर १४९ वर्षापूर्वी म्हणजे १६ एप्रिल १८५३ मध्ये मुंबई-ठाणे ह्या २१ मैलाच्या लोहमार्गावर पहिली रेल्वे गाडी धावली. मुंबई बंदर देशाच्या आंतंभागाला जोडण्याची सुरुवात झाली.

मुंबईपासून थळघाट (आजचा कसारा घाट) व बोरघाट (आताचा खंडाळा घाट) यांच्या तळापर्यंत रेल्वे नेण्याची कल्पना मुंबई सरकारचे प्रमुख अभियंता जॉर्ज क्लार्क यांना सुचली. हा विचार ते भांडुपच्या दौऱ्यावर १८४३ मध्ये गेले असताना आला. १३ जुलै १८४४ त मुंबईचे प्रमुख न्यायाधीश सर अर्सकिन पेरी यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईच्या प्रमुख नागरिकांची बैठक बोलविण्यात आली . या बैठकीत 'मुंबई बृहनपूर्व लोहमार्ग'(Bombay Great Eastern Railway) या नावाने क्लार्क यांनी मुंबई ते थळघाट (कसारा घाट) व बोरघाट (खंडाळा घाट) यांच्या पर्यंतचा लोहमार्ग तयार करण्याची योजना मांडली. यानंतर क्लार्क यांनी ठाणे ते कुर्ला या लोहमार्गाची सविस्तर योजना तयार केली. मुंबईचे मुख्य सचिव हेन्री कॉनी वेअर यांच्या प्रमुख पदाखाली एक समिती तयार केली.

या समितीने ह्या योजनेचे परीक्षण केले. पुढे १९ एप्रिल १८४५ ला कर्नल जी.आर. जार्व्हिस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मुंबईतील नागरिकांच्या बैठकीत या योजनेचा स्वीकार करण्यात आला आणि योजना कार्यान्वित करण्यासाठी एक समितीही नियुक्त झाली. यापूर्वीच्या लोहमार्गाच्या संदर्भातील जागतिक घडामोडी लक्षात घेण्याजोग्या आहेत. जगातील पहिली रेल्वेगाडी १८२५ मध्ये स्टॉक्टन ते डार्लिंग्टन दरम्यान इंग्लंडमध्ये सुरु झाली. व त्या देशातच याचे श्रेय जाते. १८२१ मध्येच जॉर्ज स्टीफन्सनने लोहमार्गाच्या बांधणीची सुरुवात केली होती. म्हणजे जगातील पहिल्या लोहमार्गानंतर ठीक २८ वर्षांनी भारतात त्याची सुरुवात झाली. इंग्लंड पाठोपाठ १८२९ मध्ये फ्रान्स, १८३५ मध्ये जर्मनी, १८३९ मध्ये हॉलंड व इटली, १८३० मध्ये अमेरिकेची संयुक्त राज्ये, १८३७ मध्ये रशिया, १८४५ मध्ये स्पेन यांनी लोहमार्ग सुरु केले.

भारतात मुंबईला याप्रमाणे योजना तयार होताच, लंडन येथे जी. आय. पी. रेल्वेची स्थापना झाली. व १५ जुलै १८४५ मध्ये ह्या कंपनीची नियमावली प्रकाशित झाली. कंपनीच्या संचालकपदी काही भारतीय संचालकही होते. ज्यामध्ये श्री. जमशेट जीजीभॉय यांचेहि नांव अंतर्भूत होते. रेल्वे इंजिनाचे पहिले निर्माते जॉर्ज स्टीफन्सन(१७८१-१८४८) हे ही संचालक पदावर होते, तर त्यांचे सुपुत्र रॉबर्ट स्टीफन्सन (१८०३-१८५९) जी. आय्. पी. कंपनीचे सल्लागार अभियंता नियुक्त झाले. काही वर्षांनी मुंबईच्या

उद्यमशील व्यक्तींच्या एका समितीकडे, लंडनच्या समितीने तयार केलेली योजना कार्यान्वित करण्याची कामगिरी आली. या कार्यवाहीनुसार १८ ऑगस्ट १८४९ ला जी. आय्. पी. रेल्वे कंपनी व ईस्ट इंडिया कंपनी मध्ये करार होऊन, ईस्ट इंडिया कंपनीकडे ५ लक्ष पौंडांची रक्कमेची या योजनेसाठी मागणी करण्यात आली.

१४ नोव्हेंबर १८४९ ला जी. आर. बर्कले यांची (Resident Engineer) अभियंता नियुक्ती झाली व कामाला वेग आला. त्यांनी फेब्रुवारी १८५० मध्ये भारतात आल्यावर सूत्रे जोरदारपणे हलविण्यास सुरुवात केली. सुमारे एक वर्षभर लोहमार्गाची पाहणी व आखणी (Survey) चालू होती व ३१ ऑक्टोबर रोजी मुंबई ते कल्याण या लोहमार्गाच्या बांधणीच्या एकच दिवस अगोदर गव्हर्नर महोदय थंड हवेच्या ठिकाणी निघून गेले होते सरकारी कचेऱ्या व बँकांना या दिवशी सुट्टी देण्यात आली होती. गाडी सुमारे पावणेपाच वाजता ठाण्याला येऊन पोहोचली. तेथे पाहुण्यांच्या चहापाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. मेजर स्वॅनसन यांनी नवी कंपनी व तिचे प्रमुख अभियंता (Chief Engineer) श्री. बर्कले यांना शुभेच्छा दिल्या व १७ एप्रिल १८५३ मध्ये सर्व मंडळी मुंबईला सायंकाळी ७ वाजता परतली. दुसऱ्या दिवशी श्री. जमशेट जीजीभॉय यांनी आपले आप्तेष्ट, मित्र-परिवारासाठी पूर्ण गाडी आरक्षित केली व त्याच्या बरोबर सर्व मंडळी ठाण्याला जाऊन मुंबईला परतली.

यानंतर वर्षभरानेच कल्याणपर्यंत लोहमार्ग नेण्याची अवघड कामगिरी पार पाडण्यात आली. त्यामुळे ठाणे पहिल्या लोहमार्गावरील अखेरचे स्थानक या स्वरुपात पहिले एकच वर्ष असले तरी तो एक ऐतिहासिक गोष्ट म्हणून नोंदवली गेली होती.

**ठाणे स्थानक**

त्यावेळी ४ एकरपेक्षा थोड्या अधिक जमिनीवर तयार करण्यात आलेले होते. स्थानकाची जमिन कशी घेण्यात आली हा ही इतिहास मनोरंजक आहे. तत्कालिन किल्ले मुंबई दप्तरातील दि. ९-१२-१८९१ च्या महसूल खात्याच्या 'Land required by G. I. P. Railway co. in the Thane District' No. 8504 या दस्तावेजावरून असे लक्षात येते की, जी आय. पी. कंपनीने ४ एकर ३१ गुंठे व ७ $^{1}/_{४}$ आणे जमीन सुमारे तीस व्यक्तींच्या ताब्यातील तुकड्यांची होती. या मंडळीपैकी 'गुलाम हुसेन मूळजी' आणि 'अंतोबा नानाभाई' ह्या दोन व्यक्ती वगळता बाकीच्यांनी ही जमीन रु. १०००/- प्रति एकर खरीप जमिन व रु. ५००/- प्रति एकर पडीक वा कुरणाची जमिन या भावाने देण्यात संमती दिली. या हिशोबाने झालेली रक्कम रु २७०१ आणे २ व पै ७ ही देण्यासंबंधीची तसेच वरील दोन व्यक्तींकडून Land Aquisition Act या प्रमाणे या भावाने जमीन घेण्यासंबंधीची कारवाई करण्याचा मसुदा वरील दस्तावेजात आढळतो. हा दस्तऐवज या Chief Secretary च्या दप्तरात तयार होऊन त्यांनी ८-१२-१८९१ रोजी तो संमत केल्याची तळटीप आढळते. शिवाय या जागेचे भाडे व कर मिळून रु. १४ आणे १३ व पै १ एवढे भाडे होत असल्याचा उल्लेख आहे.

ठाणे स्थानका संबंधीची ही ऐतिहासिक माहिती ठाणे येथीलच नव्हे तर ठाण्या बाहेरील व्यक्तींनाही मनोरंजक वाटेल. कार्यारंभ झाला. या निमित्ताने झालेल्या सोहळ्याचे उद्‌घाटन मुंबईचे प्रमुख न्यायाधीश जे. पी. विलोव्ही यांचे हस्ते शीव येथे झाले. १८५१ मध्ये मुंबई ते ठाणे या पहिल्या टप्प्याचे कंत्राट मे. फरेल ॲन्ड फाऊलर यांना देण्यात आले. या इंग्लीश कंपनीने कामावर सुमारे १० हजार मजूर राबविले. १८ फेब्रुवारी १९५२ रोजी भायखळा स्थानका दरम्यान पहिले रेल्वे इंजिन डबे जोडता-सोडता (Shunting)

करताना बघितल्याचा उल्लेख आहे.

साहजिकच हा प्रकार एक कुतुहल विषय बनला. गंमत म्हणजे या रेल्वे इंजिनाचे नामकरण मुंबई इलाख्याचे तत्कालीन गव्हर्नर लॉर्ड फॉकलंड यांचे नावावरुन 'फॉकलंड' असे करण्यात आले. अनधिकृतपणे व पाहणीसाठी १८ नोव्हेंबर १८५२ मध्ये कंपनी संचालकांनी आपल्या मित्र परिवारासह रेल्वे गाडीने मुंबई ते ठाणे असा प्रवास केला.

**उद्घाटन**

'मुंबई-ठाणे' या पहिल्या लोहमार्गाचा अधिकृत उद्घाटन सोहोळा १६ एप्रिल १८५३ मध्ये झाला. दुपारी ठीक साडेतीन वाजता जमलेल्या मोठ्या जनसमुदायाच्या हर्षजल्लोषात आणि २१ तोफांच्या सलामीने १४ डब्यांची गाडी सुमारे ४०० प्रवाशांना घेऊन स्थानकातून रवाना झाली. परंतु, आश्चर्याची गोष्ट म्हणजे ज्या गव्हर्नर साहेबांचा बँन्ड वाजत होता ते गव्हर्नर साहेब जातीने या कार्यक्रमात कुठेच नव्हते.

हरिभाऊ शेजवळ
ठाणे (प).

***

दिशाचे वर्गणीदार व्हा.
संपर्क : ५४२६२७०

## संकटांना तोंड द्या !

भारत-भ्रमणाच्या काळात स्वामी विवेकानंद वाराणशीला आले असताना हा प्रसंग.

दुर्गामातेचे दर्शन घेऊन स्वामीजी परत चालले होते. रस्त्याच्या एका बाजूला पाण्याचा तलाव होता आणि दुसरीकडे एक उंच भिंत होती. स्वामीजी त्या रस्त्याने थोडे पुढे गेले तोच काही वानरांनी त्यांचा पाठलाग सुरू केला. वाराणशीची वानरे दांडगट असतात. स्वामीजी घाबरून पळू लागले. पण वानरे आणखी वेगाने त्यांच्या मागे लागली. त्यांच्या पायात आडवी येऊ लागली. चावे घेण्याचा प्रयत्न करू लागली. स्वामीजी पुरते गांगरले.

रस्त्याच्या बाजूला बसलेल्या एका साधूने हा प्रकार पाहिला आणि तो स्वामीजींना ओरडून म्हणाला, ''पळू नका; वानरांकडे तोंड करा!''

त्याचे म्हणणे ऐकून स्वामीजी उलटे फिरले आणि वानरांकडे तोंड करून उभे राहिले. त्याबरोबर ती वानरे घाबरून एकदम मागे सरली नंतर पळून गेली.

पुढे न्यूयॉर्क मध्ये एका सभेत बोलताना स्वामीजींनी हा प्रसंग सांगितला आणि मग ते म्हणाले, '' प्रसंगातून मी आयुष्यातला एक फार मोठा धडा शिकलो. तो म्हणजे संकटांपासून पळून जायचे नाही; तर त्यांना तोंड द्यायचे, त्यांच्याशी सामना करायचा !

# मी कलेचा विश्वस्त आहे मालक नव्हे ! -संजय उपाध्ये

*गप्पाष्टक या कार्यक्रमासाठी विशेषत्वाने ओळखले जाणारे संजय उपाध्ये. ग. दि. मा पुरस्कार निमित्ताने त्यांच्याशी झालेल्या या गप्पा. - संपादक*

गप्पाष्टककार संजय उपाध्ये यांना ग. दि. मा प्रतिष्ठानचा 'चैत्रबन' पुरस्कार प्रदान करण्यात आला. पाठोपाठ त्यांच्या 'इंडेमाउ' या काव्यसंग्रहाची अखिल भारतीय बालकुमार साहित्य संमेलनाने ग. ह.पाटील सर्वोत्कृष्ट बाल साहित्य काव्यनिर्मिती केल्याचे वृत्त आले. लहान मुलांसाठीची इंडेमाउची गाणी ते मोठ्यांकरता भगवद्गीतेची गाणी, गप्पाष्टक चे सुमारे ५०० प्रयोग, 'प्रभात' वाहिन्यावरील ३१ भागात दिलेली प्रवचने, ज्ञानेश्वरीचे निरुपण, दूरदर्शनवरील 'नमस्कार मंडळी' मध्ये निवेदन आणि १७ वर्षे विविध कार्यक्रमांना निवेदन इतकी विस्तृत वाटचाल असणाऱ्या संजय उपाध्येंबद्दल मनात कुतुहल होतेच. या पुरस्कारांच्या निमित्ताने त्यांच्याशी प्रत्यक्ष बोलण्याची संधी मिळाली.

ग.दि.माडगूळकर यांना गुरु मानून एकलव्यासारखी त्यांची आराधना करूनच संजय उपाध्ये यांनी या क्षेत्रांमध्ये प्रवेश केला. त्यामुळे गुरुच्याच नावाचा पुरस्कार मिळाल्यावर काय वाटलं ? या प्रश्नावर ते म्हणाले, " प्रवासामधल्या वाटेवरची सावली" गुरुंकडून मिळाली आहे. हा पुरस्कार म्हणजे गुरुकडून पुढे जाण्यासाठी दिला जाणारा आशिर्वाद आहे. कला कारकिर्दीमध्ये या पुरस्काराच्या रुपाने 'चैत्रबन' निर्माण झाले आहे. काव्यात्मक सांगायचं तर :-

पुरस्कार लाभला ! लाभला देव आज पुण्याई ।<br>
अनाथ माझ्या शब्दमुलांना आज भेटली आई ॥

मी कोणाचेही अनुकरण केले नाही. मुळात प्रतिभेचे अनुकरण करताच येत नाही. ती उपजत असावीच लागते. म्हणून माझ्याकडे असणाऱ्या कलेचा मी विश्वस्त आहे मालक नव्हे ! असे मी मानतो.

ग. दि. माडगूळकर यांच्याविषयी सांगताना ते म्हणाले, ''लहानपणापासून गीत रामायणाची पारायणं केली आहेत. एका क्षणी माझ्या असे लक्षात आले की यापेक्षा उत्तम काही असूच शकत नाही त्याक्षणी ते माझे दैवत झाले. उत्तम दृष्टांत देत यमकावर येणे ही त्यांची खासियत मला विलक्षण भावली. 'ज्ञानियाचा वा तुक्याचा हाच माझा वंश आहे, माझिया रक्तामध्ये थोडा ईश्वराचा अंश आहे' हे त्यांचे म्हणणे मला पटले. त्यांचे लिखाण वाचल्यानंतर आपण असे काहीतरी लिहावं अशी मनात इच्छा निर्माण झाली आणि म्हणून मग मी गीत-गीता लिहिली. २५ गाण्यांमध्ये भगवद्गीता सांगितली आहे. शेवटी गुरबिन ज्ञान कहाँ । ज्ञान बिना अंजान जहाँ ॥ हेच खरं आहे.

प्रसारमाध्यमात मान्यता मिळायला उशिर झाला? असं तुम्हाला वाटत नाही का ? यावर ते म्हणाले, "कदाचित तसे असेलही. गेली १७ वर्षे मी निवेदन करतो आहे. माझ्या दोन पुस्तकांच्या दोन-दोन आवृत्या संपल्या, तिसरे पुस्तक प्रकाशनाच्या वाटेवर आहे. पण याची म्हणावी तशी दखल घेतली गेली नाही हे खरे आहे. पण या काळात रसिकमान्यता मिळाली. प्रेम करणारे रसिक, स्नेही मिळाले. त्यामध्ये पुण्याच्या लोकांचा वाटा मोठा आहे. विजय मागीकर आणि मानसी मागीकर या दाम्पत्यामुळे मी

'गप्पाष्टक' करू लागलो. गायिक अपर्णा संत आणि मंदार संत या दाम्पत्यामुळे पुस्तक प्रकाशित करण्याचा योग आला. पुण्याच्याच चंद्रकला प्रकाशनाच्या शशिकला उपाध्ये (माझ्या आडनाव भगिनी) यांनी माझा आणि त्यांचा प्रकाशनाचाही पहिला काव्यसंग्रह प्रकाशित केला. या मंडळींनी दखल घेतलीच ना!

मात्र गुणवत्ता असूनही तेवढ्या प्रमाणात त्याची प्रसिध्दी झाली नाही हे वास्तव उरतंच ? या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले, '' तुम्हीच लिहून द्या आम्ही छापतो अशा संवंग ? पणात मला रस नव्हता. मी कोणतेही निवेदन न लिहिता सादर करतो. गप्पाष्टक करतानाही कोणतीही साधनसामुग्री वापरत नाही वर, माझा विषयही लोकांना आधीच आकर्षण असलेला असा नसतो. त्यामुळे रंगमंचावर मला माझी गुणवत्ता सिध्द करावीच लागते. कालौघात मी ती सिध्द केली आहे असे मला वाटते. फरक इतकाचा आहे की, आधी प्रसिध्दी असेल आणि सादर केलं तर मिळणारा प्रतिसाद आणि प्रसिध्दीची हाव नसेल तर मिळणारा प्रतिसाद यामध्ये फरक पडतोच. आता हेच बघ ना, जर्मनीतल्या युरोपीय मराठी संमेलनात एक अ-युरोपीयन मराठी असा मी एकटाच होतो. मी तिथे 'गप्पाष्टक' केले. अडीच तासाचा कार्यक्रम झाला. पण त्याची फारशी दखल घेतली गेली नाही. हे असं होत. याचं उत्तर माझ्याकडेही नाही. एक मात्र नक्की या पुरस्कारापर्यंतचा माझा प्रवास हा रसिकांच्या माध्यमातून झाल्यामुळे 'अस्सल' आहे.

नामवंत गायक-गायिकांनी संजय उपाध्ये यांना निवेदनासाठी घेतल. पण पुढच्या गाण्यापेक्षा त्यांचं उत्स्फूर्त निवेदनच अधिक आकर्षक व्हायला लागलं, त्यातून व्हायचं तेचं झालं, याबद्दल उपाध्येंना टोकले असता ते म्हणाले, ''हिऱ्याच्या अंगठीला सोन्याचे कोंदण लागते. अंगठी बोटात घालताना लोक कोंदणाला पकडतात. आता याचा हिऱ्याला हेवा वाटायला नको. पण तसे झाले,'' निवेदनातून वेदना अशी स्वत:च्याच निवेदनाची थट्टा तुम्ही का करता? यावर ते म्हणाले, ''लोकांसमोर थट्टा करीत असलो तरी निवेदन या चार अक्षरात वेद आहे हे मी जाणतो. म्हणूनच ही थट्टा वरवरची असते.''

'इंडेमाउची गाणी' या लहान मुलांच्या काव्यसंग्रहाबद्दल सांगताना ते म्हणाले, '' या संग्रहाला पुरस्कार मिळाल्याने माझा आनंद वाढलाच आहे. इंडेमाउ म्हणजे 'इंडियन कॅट'. लहान मुलांनी मांजरासारखे व्हावे. ते कसंही फेकल तरी पायावरच पडत. परिस्थिती कशी असेल सांगता येत नाही. त्यामुळे सर्वच प्रसंगाना धैर्याने सामोरे जाता आले पाहिजे, तो विश्वास मुलांमध्ये निर्माण व्हावा म्हणून ही गाणी लिहीली. अस्थिर राजकारण, समाजकारण, शिक्षण, धर्म, संस्कृती या सगळ्या अस्थिरतेच्या गोंधळात स्थिरता निर्माण करण्याची क्षमता ज्याच्यात आहे अशी पिढी निर्माण करण्यासाठी आई-वडिलांनीच स्वत:च्या मुलांचे 'हिरो-हिरॉईन' व्हायला पाहिजे. उंबरठ्याच्या बाहेरचं हिरो-हिरोईन मुलांना आपले वाटले की आपल्या समाजाचे 'बालमानस' धोक्यात आहे असे वाटले म्हणून ही गाणी लिहीली.

संजय उपाध्ये यांनी अपंगांसाठी आपल्या परीने सामाजिक कार्य सुरु केले आहे. जोगेश्वरीच्या अस्मिता कल्याणी केंद्रासाठी त्यांनी विविध प्रयोगात आर्थिक मदत मिळवून दिली. त्याचबरोबर अपंगांच्या संस्थांसाठी नाटके लिहिली आहेत. 'मुलगी मुक्त झाली हो' हे त्यापैकीच एक नाटक. नागपूराच्या मे फ्लॉवर शाळेला इमारत बांधणीसाठी 'गप्पाष्टक' चे काही प्रयोग दिले. त्यातून ९३,००० रुपयांचे उत्पन्न शाळेला मिळाले. दरवर्षी ते एका अपंग मुलीला ट्रायसिकल भेट देतात. या सर्व मदतीमागचा उद्देश सांगताना उपाध्ये म्हणतात, ''दुसऱ्या माणसांविषयी असूया, द्वेष नसताना जगणं महत्त्वाचे आहे. आपण कोणाचं दुर्दैव दूर

करू शकत नाही. पण ते सुसह्य मात्र करू शकतो. त्या अपंगांच्या मानाने आपण धडधाकट आहोत त्यामुळे आपण त्यांच्या जीवनात आनंदच निर्माण करायला हवा.

अखेरीस गप्पाष्टक, प्रवचन यातून ते ज्या सुशिक्षित मध्यमवर्गाच्या जबाबदारींवर भर देतात त्याबद्दल विचारलं असता त्यांनी विस्तृतपणे आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, "देशाचा मज्जारज्जू, कलेची निर्मिती - जोपासना या दोन्ही गोष्टी मोठ्या प्रमाणावर घडतात तो हा मध्यमवर्ग. या सुशिक्षित मध्यमवर्गाच्या खरेदी शक्तीवर विक्रीतंत्राने विजय मिळवल्यामुळे कमी पैसे मिळूनही जास्त भौतिक सुख वाट्याला आले. त्यामुळे ध्येयहीनता आली आहे. आपण का जगत आहोत. याचं कारणच माहीत नसलेला समाज हळू हळू तयार होतो. सभोवतालच्या परिस्थितीतून समोर उभं राहणाऱ्या अपयशाला, भौतिक सुखाच्या प्रतिष्ठेला दूर करण्याचा केविलवाणा प्रयत्न सुरू आहे. या मनोवृत्तीचा परिणाम व्यक्ती जर मूळ मानली तर कुटुंब, समाज आणि राष्ट्र असा होतो आहे. (राजकारणामध्ये दहा राजकीय पक्ष आहेत. एक हजार गरीब आहेत. आणि शंभर श्रीमंत आहेत. प्रत्येक पक्षाने दहा दहा श्रीमंत आणि शंभर गरीब वाटून घेतले. आणि त्यामुळे प्रत्येकाकडे पैसा आहे आणि प्रत्येकाच्या मोर्चाला माणसं आहेत.) सुशिक्षित मध्यमवर्ग हा या रचनेत मोडत नाही. त्याला भौतिक सुखात गुंडाळून ठेवला आहे. त्याच्या प्रतिष्ठेच्या कल्पनाच बदलवून टाकल्या की बल, सत्ता, संपत्ती या तीनही गोष्टी सहजतेने आमच्या देशात उपलब्ध होतात.

यांना शहाणे करण्यासाठी एकच मंच आता शिल्लक आहे, तो आहे 'कलावंताचा मंच'. पण तोही दुर्दैवाने कलेच्या माध्यमातून अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अकरा महिन्यानंतर आपला 'नाताळ' साजरा करतो आणि रसिकांचा बुद्धिभेद हेच अभिजात कलानिर्मितीचे लक्षण आहे, असे समजत असल्यामुळे द्रष्ट्या मार्गदर्शनाची जबाबदारी कोणीच उचलत नाही. म्हणून कॅनरा बँकेतली नोकरी सोडून गेली पाच वर्षे कला सादरीकरणातून मनोरंजन करीत 'मित्र' म्हणून सगळ्यानांच अंतर्मुख करण्याचे काम मी करतो आहे."

संजय उपाध्ये यांचं वरील बोलणंच आजपर्यंत प्रसारमाध्यम मान्यता मिळण्यास अडसर झालयं की काय कोण जाणे ?

**नीलेश गोरे**
पारसिक नगर, कळवा, ठाणे.

***

# एकात्मता

धर्म हा व्यक्ती परमेश्वरामधला संबंध आहे. हिंदू आपल्या मंदिरात आळविण्याचा प्रयत्न करतो तर मुसलमान मशिदीत अल्लाशी संभाषण करण्याचा प्रयत्न करतो. ख्रिस्ती आपल्या चर्चमध्ये परमेश्वराला हाक मारतो. तर शीख गुरुद्वारामध्ये परमेश्वराची प्रार्थना करतो. हे संपल्यानंतर मंदिरातून, मशिदीतून, गुरुद्वारातून किंवा चर्चमधून जो माणूस बाहेर पडतो तो फक्त भारतीय आहे ही भावना मनात रुजली पाहिजे.

पूजा नेहमी चांगल्या गोष्टींची, सत्याची व न्यायाची होत असते. अन्यायाचा व द्वेषाचा विजय कधीच होत नाही.

# स्टुडंटस् एनसायक्लोपीडीया ब्रिटानिका (इंडिया) - ज्ञानाचा खजिना

*ब्रिटानिकाच्या विद्यार्थ्यांसाठी या सात खंडांची अलीकडेच बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालयात खरेदी केलेली आहे. या सात खंडांचा ग्रंथालय शास्त्राच्या विद्यार्थीनीने केलेला हा परिचय. - संपादक*

ज्ञानकोशाला इंग्रजीत 'Encylopaedia' अशी संज्ञा आहे. 'एन्सायक्लोपीडिया' हा शब्द मूळ ग्रीक शब्द 'एन्क्योक्लियॉस पैडिया' 'Encyklios Paideia' या पासून आलेला आहे. त्याचा अर्थ 'सार्वत्रिक शिक्षण' असा आहे. याचा अभिप्रेत अर्थ 'ज्ञानाचे वर्तुळ' किंवा 'विद्येचे वर्तुळ' किंवा विद्येची परिपूर्ण पद्धती असा आहे. आधुनिक ज्ञानकोश तयार करण्यात असा हेतू प्रचलित आणि आवश्यक अशी माहिती संक्षिप्त रुपाने, सुलभ रीतीने जो त्या विषयात तज्ञ नाही अशा वाचकालाही मिळेल अशा स्वरुपात पुरविणे.

ग्रंथालयीन संदर्भासाठी मोलाचे कार्य करणाऱ्या ब्रिटानिकाने ' विद्यार्थ्यांसाठीचा ब्रिटानिका (इंडिया) ज्ञानकोश ' प्रकाशित केला आहे. अशा प्रकारचा ज्ञानकोश प्रथमच एखाद्या देशासंबंधी किंवा जगाच्या विशिष्ट भूविभागाकरिता प्रसिध्द झाला आहे. भारतासाठीचा ब्रिटानिकाची कॉम्पॅक्ट डिस्क (CD) आणि ऑन लाईन व्हर्जन ही उपलब्ध आहे.

इंग्रजी भाषेत संदर्भासाठी कार्य करणारे ब्रिटानिका हे जुने प्रकाशन आहे. एनसायक्लोपिडिया ब्रिटानिकाची पहिली आवृत्ती १७६८ ते १७७१ च्या दरम्यान इडनबर्ग आणि स्कॉटलंड येथे प्रसिध्द झाली. त्याची अद्यायवता ही प्रकाशित आणि इलेक्ट्रॉनिक व्हर्जन ह्या दोन्ही मध्ये ठेवण्यात आली आहे.

ब्रिटानिकाचा हा कोश जसा भारत ह्या भूविभागावर आधारित आहे तसाच तो जगातील इतर देशाकरिता सुध्दा उपलब्ध आहे. उदाहरणार्थ जपान, चायना, कोरिया, हंगेरी इत्यादी. इनसायक्लोपीडीया ब्रिटानिका (भारत) हा १९९८ साली स्थापित करण्यात आला. ब्रिटानिकाला भारताच्या शैक्षणिक तसेच सांस्कृतिक वारसा या गोष्टींचा आदर आहे.

विद्यार्थ्यांसाठीचा ब्रिटानिकाचा ज्ञानकोश (भारत) सात खंडामध्ये उपलब्ध आहे. या सात खंडांमध्ये भारतातील धर्म, भाषा, कला, संस्कृती रितीरिवाजा पासून ते आजच्या अद्ययावत संगणक आणि माहिती क्षेत्रापर्यंतची माहिती उपलब्ध आहे. तसेच भारतातील शहरे, गावे, खेडी तेथील पुरातन मंदिरे व त्याचे स्थापत्यशास्त्र या विषयाची माहिती विस्तृतपणे दिली आहे. यातील माहितीची रचना इंग्रजी वर्णमालेनुसार केली आहे तसेच चित्रे व नकाशा देऊन अधिक माहिती पुरवण्याचा प्रयत्न केला आहे. यातील माहिती विद्यार्थ्यांना समजेल अशा आकलनीय व सोप्या भाषेत मांडली आहे.

एनसायक्लोपेडिया ब्रिटानिकाचे सात खंड खालील प्रमाणे.

खंड १. Abd. Allahibn al-Abbas to cypress.

खंड २. Dadra and Nagar Hareli to Hyena.

खंड ३. Iblis to Mirabai

खंड ४. Muraj to Shashtri

खंड ५. Shat to zurvan

खंड ६. Selected Essays

खंड ७. Careers

खंड १ मध्ये A या इंग्रजी अनुवर्णापासून चालू झालेले शब्द आहेत आणि खंड ५मध्ये Z पर्यंत शब्द दिले आहेत उदाहरणार्थ Abd Allah Ibn al-abbas to zurvan दिलेले आहेत.

खंड ४ मध्ये National Anthem ह्या शब्दाखाली आपले राष्ट्रगीत लिहून त्याखाली त्याचे इंग्लीश भाषांतर केले आहे. त्यानंतर लगेचच ह्या शब्दाखाली सर्व राष्ट्रीय शौर्य पदक व त्याची माहिती सचित्र दिली आहे. नौदल, वायूदल, भूदल यांची शौर्य पदके व उपयुक्त माहिती दिली आहे.

खंड ६. मध्ये निवडक निबंध (Selected Essays)

या खंडामध्ये कला, संस्कृती आणि खेळ, लोक आणि समाज विज्ञान, तंत्रज्ञान आणि जैवविज्ञान तसेच अर्थशास्त्र, राजकारण आणि शासन ह्या सर्व विषयांवर आधारित निबंध दिले आहेत. भारतातील अर्थशास्त्र तसेच परराष्ट्रीय धोरण तसेच सार्क ह्या संघटनेविषयी विस्तृत निबंध सादर केले आहेत. भारताचे संविधान राष्ट्रीय सुरक्षा तसेच भारताची स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्य उत्तर स्थिती ह्या दोन्ही निबंधांचे विस्तृत विवेचन दिले आहे. भारतातील खेळणी, कला, वास्तुकला, शिल्पकला ह्यावर सचित्र निबंध सादर केले आहेत. वर्ल्ड ट्रेड ऑर्गनाइझेशन (WTO) ह्या निबंधात गॅट ह्या कराराविषयी बरीच माहिती दिलेली आहे. ह्या खंडातील सर्व निबंध कुठल्याही शाखेच्या विद्यार्थ्याला उपयुक्त होईल असे आहेत. या निबंधांची भाषा आकलनीय अशा सोप्या भाषेत मांडली आहे.

खंड ७ मध्ये (Career) करिअर किंवा कार्यक्षेत्र ह्या बाबत अत्यंत मौलिक आणि विस्तृत माहिती दिली आहे. एकविसाव्या शतकातील कार्यक्षेत्र निवडण्याची संधी ह्या खंडामध्ये आहे. बारावी नंतर कार्यक्षेत्र निवडणाऱ्या विद्यार्थ्यांना अधिक उपयुक्त आहे. ह्या खंडामध्ये ॲडव्हर्टाइझमेंट पासून ते व्हेटर्निटी सायन्स पर्यंतच्या कार्यक्षेत्राची माहिती, त्यांच्या संस्था आणि विषय यांची माहिती, आपल्याला ग्रंथालय शास्त्राविषयी विस्तृत माहिती तसेच त्या क्षेत्रातले विशेषज्ञ होण्यासाठीची माहिती दिलेली आहे. त्याक्षेत्रासाठी लागणारी शैक्षणिक पात्रता, त्या क्षेत्राविषयी शिकवले जाणारे कोर्सेस, कोठे शिकवले जातात त्या संस्थेची नावे व पत्ता देण्यात आले आहे. या खंडांची रचना सुध्दा अनुवर्णानुसार आहे आणि भाषा सोपी व आकलनीय आहे. ह्या खंडाच्या शेवटी विविध शैक्षणिक संस्थांची सूची दिली आहे. ही सूची सुध्दा अनुवर्णानुसार आहे.

असा हा एन्सायक्लोपिडीया ब्रिटानिकाचा ज्ञानकोश विद्यार्थ्यांनी आवर्जून वापरावा असा आहे. हा ज्ञानकोश सर्व शैक्षणिक ग्रंथालयांनी ग्रंथालयात ठेवावा असा उपयुक्त संदर्भ ग्रंथ आहे.

**सौ. वनिता नामदेव कदम**
विद्याप्रसारक मंडळाच्या
यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या केंद्रातील
ग्रंथालय शास्त्राच्या विद्यार्थिनी.

***

# वाढदिवस

*प्रत्येक व्यक्तीला आपला वाढदिवस हा आनंददायी जावा असे वाटत असते. या वाढदिवसाबद्दल- संपादक*

वाढदिवस, जन्मदिन आपण साजरा करतो. का करतो ? असा प्रश्न विचारला की अनेक प्रकारची उत्तरे समोर येतील. आजच्या काळात आपण वाढदिवस का साजरा करतो हे स्वत:च्या मनाला विचारून पहा.

अनंत योनीतून आपल्याला हा मनुष्यजन्म प्राप्त झालाय. बुद्धीचा वापर आपण करून सुसंस्कारित असायला हवे. आपण पाश्चात्यांचे अनुकरण करतोय ते किती योग्य आहे. 'नकल में भी अकल होनी चाहिए' भारतीय संस्कृती एक उच्च संस्कृती आहे ते सोडून बाहेरचा कचरा आपण जमा करीत आहोत.

आमच्या लहानपणी वाढदिवस म्हणजे अपूर्व सोहळा असायचा. त्या दिवसाची आम्ही आतुरतेने वाट बघायचो. सकाळी छान तेल लावून आई आंघोळ घालायची. मग नवीन कपडे घालून घरातील, देवाला, मोठ्या माणसांना नमस्कार करायचा, देवळात जायचे. दुपारी गोडधोडचे जेवण. संध्याकाळी आमंत्रित नसलेले पण आवर्जून प्रेमपूर्वक आलेले शेजारी व एक दोन नातेवाईक. प्रेमाने एखादे पेन किंवा रुमाल दिला तरी त्याचे कौतुक असायचे. सगळ्यात मौलिक असायचा तो आशिर्वाद. 'बुके' आणायची पध्दत नव्हती.

संध्याकाळी आई-आजी औक्षण करायच्या. डोळ्यावर कापूस ठेवून कापसासारखे केस पिकेपर्यंत आयुष्य लाभो असे आशिर्वाद दयायच्या. नमस्काराने डोक्यात रक्त उतरते, नम्रता येते, शुभाशिर्वादाचा हात डोक्यावर ठेवण्याने देणाऱ्याच्या सर्व शुभ विचारशक्तींचा परिणाम आपल्यावर होतो. रेकी म्हणजे तरी काय ? किंवा मन:शक्ती केंद्रातून आपल्याला सतत हेच शिकवले जाते. आपण आपल्याजवळ काय आहे तेच विसरत चाललो आहोत.

आज जंगी पार्टी आयोजित केली जाते, दिवा विझवून, केक कापून वाढदिवस साजरा करतो. आपल्याला 'तमसो मा: ज्योतिर्गमय' यातून 'अंधारातून प्रकाशाकडे जा' असे सांगत आले आणि आपल्याच कुल दीपकाकडून आपला दिवा विझवतो. जो सुरी धरू शकत नाही त्याला आपण कापायला शिकवतो. प्रतिष्ठा दाखविण्यासाठी आणलेली मोठी 'प्रेझेंट्स' पाश्चात्य संगीत यातून आपले मूल्य फक्त घ्यायला शिकते. त्याचा दान करायला शिकवावे. एखादया गरजू संस्थेला त्याच पैशातून त्याच्या हस्ते मदत दयावी.

लहानपणापासून मिळालेले आहेर, लाड, विनासायास पुरवले जाणारे हट्ट यामुळे परिस्थितीची जाणीव मुलांना होत नाही.

मी असे एक पालक बघितले, श्रीमंत, उच्च वर्गाशी संबंधित मुलीने अथवा मुलाने १८ वर्षांचे झाल्यावर सज्ञान झाला म्हणून जवळ बसवून एक 'पेग' ऑफर केला. मुले वयात आल्यावर त्याच्याशी मित्रत्वाच्या नात्याने वागावे हे ठीक. १८ व्या वर्षी सज्ञान झाल्यावर त्याला त्याच्या सामाजिक, नैतिक जबाबदारीची जाणीव करून दयायला हवी. आपणच वाढदिवसाला मुलांना वाईट मार्ग दाखवून संस्कृतीचा विसर पाडतो. आणि हाच मुलगा पुढे खिशातून नोटांचे बंडल काढून फेकतो आणि ऋणातून मुक्त होऊ पाहतो.

तेव्हा जागे होण्यापेक्षा आत्ताच जागे व्हायला हवे. 'मम्मी' न होता आई व्हायला हवे. House चे Home व्हायला हवे. याची प्रत्येक पायरी वाढदिवसाने वाढलेल्या

(पान क्र. २६वर)

# इंधन वाचविण्यासाठी : भाग २

*श्री. वि. ना. कोपरकर यांचा प्रशिक्षणाचा निवेदनातील पुर्णतः भाग .- संपादकीय*

**तांत्रिक भाग**

कमीत कमी एक तासाच्या अवधीत तुम्हाला लक्षात येईल की आपल्याला कोणी बनवत नाही ना ? एवढा भाग झाला तरी पुष्कळ आहे. मी प्रत्येक ए.व्ही. ओला सांगतो की आमची ड्रायव्हर मंडळी तुमच्याकडे येतील तेव्हा माहिती दया. पण त्यांची अशी तक्रार आहे की आमच्याकडे ड्रायव्हर कोणी येतच नाही. तेव्हा कृपया माझी अशी विनंती आहे की महिन्यातला एक दिवस आणि त्यातला फक्त एक तास स्वतःचा खर्च करा आणि मेनवर्कशॉप मध्ये जा. त्याठिकाणी गेल्यानंतर तुम्हाला अनेक गोष्टी दिसतील. किंवा नवीन माहिती मिळेल आणि काम चांगल होईल.

आता सिंक्रमिक्स् गियर बॉक्सच्या गाड्या येतात. हे सिंगल क्लचकरून आपण गियर ऑपरेट करू शकतो. जोपर्यंत आपल्या डेपोमध्ये अशा प्रकारच्या गाड्या येत नाही तोपर्यंत आपल्या डाव्या पायाला ही सवय असणे आवश्यक आहे. आणि डबल-डी क्लच केलाच पाहिजे. डबल-डी क्लच न केल्यामुळे गिअरबॉक्सचे आपण फार मोठ नुकसान करतो. यातला कुठलाही भाग रिपेअर करायच्या लायकीचा नाही उचलायचा भंगारात फेकून द्यायचा आणि नवीन बसवायचा. तर बाजारात जाऊन चौकशी करा एकदा की फर्स्ट गिअर फर्स्टची किमंत काय आहे, सेंकडली काय आहे. डोळे पांढरे होतील आपले. इतक जबरदस्त नुकसान आपण करत असतो. आणि गियर पडत नाही म्हणून तक्रारपण आपणच करत असतो. गिअर बॉक्सच्या केसिंगला ला मार लागला तर अठ्ठावीस ते एकोणतीस हजाराची गिअर बॉक्स बदली करायला लागते.

कल्पना करा स्वतःची गाडी असेल तर काय होईल. गाडी ही विकायला लागेल आणि स्वतःलाही विकायला लागेल. तेव्हा डबल-डी क्लच हा केलाच पाहिजे. कोणावरही आपण मेहरबानी करत नाही. गाडी चालवण्याच ते प्रिन्सिपल आहे. या पध्दतीने जर सुरु झालं तर जर जी सिडकोची अवस्था झाली ती या एस. टी. महामंडळाची व्हायला काय वेळ लागणार नाहीये. तेव्हा आपली संस्था ही अबाधित राहिली पाहिजे आपली नोकरी अबाधित राहिली पाहिजे. या ठिकाणी प्रव्हिडंट फंड, ग्रॅच्युटी आपल्या मुलाबाळांना आपल्याला द्यायचंय असा प्रत्येकाच्या मनात विचार असण आवश्यक आहे. क्लचवर पाय ठेवून गाडी चालवू नका तर इंग्रजीमध्ये 'रायडिंग ऑन क्लच' अस म्हणतात. पूर्वीच्या काळामध्ये क्लच जरा धरून ठेव अशी सांगण्याची पध्दत होती. पण मी १९५५-५६ ला लायसेन्स काढलयं. त्यावेळेला सांगत, क्लच जरा धरून ठेव. पण जशी मशिनरी ॲडव्हान्स झाली, त्यामध्ये बदल झाले तेव्हा कळायला लागले की क्लचवर पाय ठेवल्यामुळे काय नुकसान होत. आणि म्हणून आता सांगायला लागले की गियर बदलण्याच काम झाल्यावरोबर क्लचचा पाय उठवा आणि खाली ठेवा. पायाला आराम देण्याकरता म्हणून क्लचवर पाय ठेवून चालू नका. का ठेवायचा नाही ? तर क्लचमध्ये फ्रीप्ले ठेवलेला असतो फ्रीप्ले याचा अर्थ दाब न देता दबला जाणारच आहे. पण नुसता पाय ठेवला तरी आतमध्ये जातो. याला म्हणतात प्ले. मी आपल्याला जर विचारलं, की तुम्ही 'लेलँड' गाडी आहे म्हणून सांगणार ? आणि ज्यावेळेला तुम्ही एखाद्या मेकॅनिककडे जाता आणि तो विचारतो तुम्ही याला सांगता

की जरा क्लच प्ले सेट करून द्या. त्या मेकॅनिकने तुम्हाला जर विचारलं की बाबारे तुला किती हवाय ? तर सांगता आलं पाहिजे, पावणेचार इंचाचा पाहिजे. तेव्हा त्या मेकॅनिकला पण समजतं की ह्या माणसाला कसही काम करून चालणार नाही. याला माहिती आहे. तेव्हा सांगता आलं पाहिजे, टाटाचा सव्वाइंचाचा प्ले आहे. किंवा तीस एम. एमचा अणि लेलँडचा पावणेचार इंचाचा प्ले आहे.

रस्त्यावर तुमची गाडी धावत असते. रस्त्यावरती खाच-खळगे आहेत, खड्डे आहेत. अनिर्बंध रस्ता आहे. गाडीला धक्के बसत असतात. नकळत आपल्या पायाला सुध्दा धक्के बसतात. आपला पाय मागे-पुढे हलत असतो. त्यामुळे ती क्लच प्ले हजारवेळा जोडली जाते हजारवेळा तोडली जाते. पण वारंवार असा प्रकार झाल्यामुळे काही रिबीट तुटण्याची शक्यता असते. आणि त्यामुळे क्लच स्लिप व्हायला लागतो. बरोबर गियर पडत नाही. किंवा गाडी मोशन पकडत नाही अशी स्थिती सुरू होते. अशावेळेला ही क्लचप्लेट बदलायला लागते.

क्लच प्लेट बदलायची म्हणजे काय करायच ? तर पहिली गियर-बॉक्स डाऊन करायला लागते. तेव्हाच क्लच निघतो. त्या करता दोन माणसांची जरूरी असते. त्यांची मजुरी, एका क्लचप्लेटची किंमत नऊशे ते हजार रुपये आणि साधारणतः हे काढून बसवायचा म्हणजे चार तासाचा वेळ जातो. म्हणजे चारतास गाडी रस्त्यावरती धावली असती तर काही पैसे जमवून आणले असते. तेही बुडतात म्हणजे एक क्लच प्लेट बदलायची असेल तर मालकाला किंवा कंपनीला बाराशे ते पंधराशे रुपये खर्च येतो. केवळ आपली एक चूक की क्लचवर पाय ठेवून आपण गाडी चालवतो. आम्ही बॉम्बे बी. इ. एस. टी मध्ये ड्रायव्हर केबिनमध्ये लिहून ठेवलेलं असायचं की क्लचवरचा पाय क्लचवर जास्त वेळ राहिला की तो जर जोरजोराने वाजायचा लागायचा की ड्रायव्हरला समजायच की आपला पाय क्लचवरती आहे. काही गाड्यामध्ये असे लुकलुकते दिवे ठेवले की त्या क्लचवर पाय राहिला की त्या ड्रायव्हरच्या समोरचा दिवा सारखा लुलुकत राहायचा आणि ड्रायव्हरला आपली चूक समजायची. अशा अनेक लोकांची सवय आम्ही घालवली. आणि त्यामुळे होणारे क्लचप्लेटच नुकसान टळलं. ही पॉवर आहे, ताकद आहे ती मागल्या चाकापर्यंत आपल्याला पोचवायची असते. आपली पहिली चाकं, मागची चाकं चालतात मग पुढली चालतात बरोबर आहे ना ? सायकलचा फ्रीव्हील आणि मेन मागे आहे. आपण पॅडल मारल्यानंतर मागचं चाक आधी चालतं, आणि पुढच स्टेअरींगवर बसल्यावर ऑटोमेटीक चालत. तर ही पॉवर आहे ती मागल्या चाकापर्यंत पोचवायला लागते जर क्लचवर पाय ठेवून आपण गाडी चालवली तर त्यामध्ये अडथळा निर्माण होतो. आणि तेलाचा खर्च वाढतो. असं दोन प्रकारच नुकसान क्लचवर पाय ठेवून गाडी चालवल्यामुळे होते. तेव्हा आपल गियर बदलण्याचे काम, नंतर क्लचचा पाय उठवा आणि खाली ठेवा. अति वेगाने गाडी चालवू नका. डिझेल आणि पेट्रोल वाचवायचं.

त्याकरता एक वेगमर्यादा ठरवून दिलेली आहे. की चाळीस पासून साठ किंवा पासष्ट वेगापर्यंत गाडी चालवली तरीसुध्दा डिझेल, पेट्रोल वाचतं. पण त्याचापेक्षा जास्त वेगाने ऐंशी-नव्वद च्या वेगाने गाडी चालवली तर असं दिसेल की तुम्ही तेल जास्त खर्च कलेला आहे. पण वाऱ्याचा दबाव ही ताकद रोखण्याचा प्रयत्न करतो. आपली गाडी विमानासारखी निमुळती नाही आहे. बाजूने हवा पास होण्याकरात. पुढल्या बाजूने संपूर्ण फ्लॅट आहे. तेव्हा सगळाच दबाव तिथे अडला जातो. आणि तो पार करण्याकरता आपण तेलाचा करून गाडीची ताकद वाढवतो. या संघर्षामध्ये नेहमी तेलाचा खर्च वाढतो. उदारहरण दिल म्हणजे लक्षात येईल. समजा सायकल घेऊन चाललेले आहात. समोरून येताना जर उलटा वारा असेल तर काय होतं ! पायडल मारून माणूस थकतो. पण

त्यामानाने सायकल पुढे जात नाही. तोच अनुभव गाडीच्या बाबतीत आहे. म्हणून या प्रमाणे पी. सी आर. ए. ने एक प्रयोग केला. तीन सारख्या गाड्या घेतल्या. तिघांमध्ये सारखा बोजा भरला. आणि तिघांमध्य एकशेसाठ लिटर तेल सुध्दा सारख भरलं. एक गाडी ४०-५० या वेगाने सोडली. दुसरी गाडी ६५-७० या वेगाने सोडली. आणि तिसरी गाडी ७०-८० किलोमीटर या वेगाने सोडली. अनुभव असा आला की ४०-५५ स्पीडने गेलेली गाडी ही जास्त अंतर कापू शकली. आणि त्याच्याआधी या दोन्ही गाड्या डिझेल संपल्यामुळे बंद पडल्या. तेव्हा स्थिर वेगाने असताना गाडी चालवली असताना आपण डिझेलची चांगल्या प्रकारे बचत करू शकतो. असा अनुभव त्याठिकाणी मिळाला. एक भाग झाला.

दुसरा भाग अतिवेगाने गाडी चालवल्यामुळे एखाद्या जबरदस्त अक्सिडेंटला सुध्दा आपल्याला सामोर जावं लागतं. वारंवार ब्रेकचा वापर करावा लागतो. आणि त्यामुळे टायर ट्यूबची घिसावटही होते. आणि लायनरची घिसावटपण होते.

तिसरा भाग : शास्त्रज्ञांनी असं सिध्द केलेलं आहे की, जे अतिशय वेगात कशी नेहमी गाडी चालवतात यांना काही वर्षांनी ब्लडप्रेशर नावाचा रोग लागू शकतो. सर्वांना लागतो असं नाही पण लागण्याचा संभव जरूर आहे. त्याचं कारण सांगताना त्यांनी असं सांगितलं की ड्रायव्हरचं जीवन अनियमित आहे. तो कधी मॉर्निंग ड्युटी करतो, कधी डे ड्युटी करातो तर कधी नाइट ड्युटी करतो. त्याच्या खाण्याच्या, झोपण्याच्या वेळा बदलतात. पुरेशी विश्रांती मिळत नाही. आणि काही ड्रायव्हर व्यसनी असतात. या सगळ्यांचा परिणाम त्याला काही वर्षांनी ब्लडप्रेशर नावाचा रोग लागू शकतो. आणि हा रोग एकदा तुम्हाला जडला, की या हिंदुस्थानातले सगळे डॉक्टर जरी कोळून प्यायलात तरी तो पूर्णपणे कधीही बरा होत नाही. त्याची रेज खालती वरती होईल आता ८०-१२० झाली १२० ची १५० झाली. पुन्हा सत्तर आली. परंतु संपूर्ण रोग बरा होत नाही. एकदिवस तुम्हाला तो घेऊन जाणार. एखादा ॲक्सिडेंट झाला तर एकही प्रवासी गाडीत शिल्लक राहात नाही. पटापट उतरून पळतात. आणि सगळं आपल्याला निस्तरावं लागंत. मग हे सगळ माहीत असताना गाडी कशाकरता पळवायची ? तुम्ही पाच किंवा दहा मिनिटे लेट आले तर तुम्हा कोणी अधिकारी शिक्षा करतात का ? नाही करत. पण एखादा ॲक्सिडेंट करून आलात तर तेच ऑफिसर तुम्हाला विचारणार आहेत तुला कुणी गाडी पळवायला सांगितली? तुम्हाला आम्ही रनिंग टाईम मोजून दिलेला आहे. वेग-मर्यादा ठरवून दिलेली आहे. आता तुझ्या कर्मांची फळ तू भोग. तेव्हा ते स्पीड लिमिट दिलयं त्या स्पीडलिमिटच्या अंतर्गत आपण गाडी चालवायची आहे. कोण काय सांगत इकडं बघायचं नाही. माझ्या पाठीमागे जे ५० प्रवासी भरलेले आहेत. जिवंत माल आहे. या जिवंत मालाला मला सांभाळून न्यायचयं आणि त्यात माझासुध्दा एक जीव आहे. याप्रमाणे आपण गाडी चालवणे आवश्कता आहे.

तेव्हा स्थिरवेगाने गाडी चालवून हे अत्यंत आवश्यक आहे. गियर बदली करा, गतिप्रमाणे गियर बदली करा. मी विषय सांगितला की गतिप्रमाणे गियर बदली करा. ज्यावेळेला कुठलीही मॅन्युफॅक्चरींग कंपनी गियर बॉक्स बनवते किंवा तयार करते. तेव्हा गियरच रेशो ठरवून दिलेला असतो. कुठल्या गियरमध्ये कीती अंतर गाडी चालवावी. मी नेहमी चलकाला सांगतो की इंजिन जे आहे हे ड्रायव्हरशी बोलत असत. फक्त ड्रायव्हरला त्याची भाषा समजली पाहिजे. ते इतक्या जोराजोराने ओरडतं की बाबारे माझी गती संपली आता दुसरा गियर घे परंतु आमच्या कानात नाही शिरत. आम्ही त्याच पध्दतीने चालू असतो. जितका जास्त वेळ आणि जास्त अंतर लो गियरमध्ये इंजिन रेज करून गाडी चालवावं तेवढा डिझेल खर्च हा नेहमी वाढत

जाणार आहे कधीही कमी होणार नाही. निरनिराळ्या गाड्यांमध्ये निरनिराळे रेशो असतात. टाटाने रेशो दिलेले आहेत ० ते ८, ९ ते १५, १६ ते २७ आणि २७ ते ४० लेलँडने गियरचे प्रयोग ठरवून दिलेले आहेत १ ते १०, ११ ते २०, २१ ते ३ आणि ३० च्या पुढे टॉप.. तर जशी जशी आपल्या गाडीची गती वाढते त्या त्या प्रमाणात आपले गियर बदली झाले पाहिजेत.

ॲक्सिलेटरचा दुरुपयोग करू नका. सर्वात जास्तीत जास्त तेल खर्च करण्याचा काम हा ॲक्सिलेटर करत असतो. आता जितका दुरुपयोग तुम्ही कराल तेवढा तेलाचा खर्च हा नेहमी वाढत जाणार आहे. एक दोन-तीन उदाहरणे देतो म्हणजे आपल्या लक्षात येईल, समजा एखादया सिग्नलला तुमची गाडी उभी आहे. सिग्नल बंद झाल्यामुळे. तुमच्यापुढे १०-१५ गाड्या उभ्या आहेत सिग्नल चालू झालेला आहे. एक एक गाडी उठायला लागते. आपला पुढला गाडीवाला जरा उठायला वेळ लावतो. मग मागचा ड्रायव्हर काय करतो. इंजिन जोराने रेज करून त्याला इशारा देतो की बाबारे उठ!

दुसरं उदाहरण देतो स्टॉपवर तुम्हाला गाडी लावायची आहे. प्रवासी स्टॉपच्या शेडमध्ये कधीच उभे नसतात थोडेसे पुढे येऊन उभे राहतात मग त्यांना मागे हटवण्याकरता आपण काय करतो? इंजिन तर रेज करतोच पण त्याबरोबर अर्धा क्लच ठेवतो की गाडी पळता पळणार नाही. अर्धाक्लच ठेवल्यामुळे क्लच नुकसान, इंजिन रेज केल्यामुळे तेलाचा खर्च वाढतो.

आणखीन एक मी महाराष्ट्रात आणि गुजरातला प्रयोग बघितला त्याचं ही उदाहरण सांगतो की समजा येथून तुम्ही वाड्याला गाडी घेऊन चाललेले आहात. एखाद्या स्टॉपवरती तुमची गाडी उभी आहे. प्रवासी उतरण्याचं आणि भरण्याचं काम चालू आहे. परंतु ड्रायव्हरला जरा घाई झालेली असते. मग कंडक्टरने लवकर बेल मारावी म्हणून सुध्दा इंजिन रेज करून इशारा देणारे ड्रायव्हर आहेत. किंवा काही ड्रायव्हर काय करतात, आपली गाडी गियरमध्ये टाकतात आणि थोडी हलवतात बाबारे लवकर घंटी मार जितका दुरुपयोग कराल तेवढा तेलाचा खर्च वाढणार आहे. ॲक्सिलेटरचा उपयोग अक्सिलेट सारखा करा. प्रेशर योग्य ठेवा. भरून घ्या मगच आपल्या कामाला लागा. जसं टायरमध्ये हवेच प्रमाण कमी असता कामा नये.

एक-एक थेंब गळत येतो म्हणून त्याकडे दुर्लक्ष करू नका. मेकॅनिक स्टाफला सुध्दा मी सांगितलं आहे. की ड्रायव्हरच्या ताब्यात गाडी देताना कुठे तेलाची गळती नाही आहे हे तपासून बघा. पण तरीसुध्दा त्यांच्या नजरेत नाही आलं आणि तुमच्या नजरेत आल की या ठिकाणाहून एक-एक, दोन-दोन थेंब गळतायेत तस योग्य माणसाला दाखवा. आणि तेल गळणार बंद करून घ्या. एक लक्षात ठेवा आपलं काम करून घ्यायचं असेल तर दुसऱ्याच्या पोटात शिरण्याची कल्पना आपल्याला पाहिजे. तुम्ही एखादया फिटरकडे जाऊन सांगितल 'ए काम कर' तो कधीच करणार नाहीये. पण जरा वेगळ्या भाषेत फिटरसाहेब जरा बघा, दोन थेंब गळतायेत. अरेरावी चालत नाही. काही ठिकाणी मृदुसुध्दा बोलायला लागतं फिटरसाहेब म्हटल्यामुळे आपण काही प्यून बनत नाही. जर आपलं काम करून घ्यायचं तर म्हणा की फिटरसाहेब, काय बिघडंत आपलं? एका सेकंदात एक थेंब गळून गेला असा सारखा ठिपकत राहिला. तर वर्षाला दोनहजार लिटर पेट्रोल बरबाद होतं. इतक जबरदस्त नुकसान त्यामध्ये होत असत. तेव्हा अस एक-दोन-दोन थेंब गळत नाहीयेत ना याची काळजी आपण घ्यायची. कारण लोकांना आपण सांगतो की प्रत्येक थेंब महत्वाचा आणि मोलाचा आहे आणि तो वाचवायचाय. आपण त्या दृष्टीने आग्रही भूमिका घेतली पाहिजे. 'कृपया हे मला बंद करून द्या', हे सांगता आलं पाहिजे आपल्याला. काही घाबरण्यांच कराण नाही आहे. मान ताठ करून जा तोंडामध्ये साखर असली पाहिजे. काम

करून घ्यायचयं तर ते होऊ शकतं. आणि त्याप्रमाणे आम्ही फिटरलासुध्दा त्याची कल्पना दिलेली आहे.

ज्या ठिकाणी इलेक्ट्रिक सिग्नल आहे त्या ठिकाणी गाडीचे इंजिन बंद करण्याची गरज नाही. पहिले सगळे इलेक्ट्रिक सिग्नल असतात. ते सेकंदात असतात पोलीसच्या हातातले सिग्नल ही किती वेळ असू शकतात. सिग्नलला तुम्ही गाडी बंद केल्यामुळे तेल वाचणार आहे. त्याच्यापेक्षा स्टार्ट करताना पुन्हा जास्त ताकद दिल्यामुळे जास्त तेल खर्च होणार आहे. अशा ठिकाणी बंद करण्याची जरूरी नाही. पण तुम्ही गाडी घेऊन चालले आहात, पुढे ट्राफिक जाम झालेल आहे. असे आपल्या लक्षात आले तर अशा वळेला आपल्या गाडीचं इंजिन बंद केल गेलं पाहिजे. कारण एका जागेवरती एक तास गाडी उभी केली. आणि ऑयलिंग स्पिडमध्ये इंजिन चालू ठेवल. तर तासाला दोन लिटर तेल खर्च होत. आणि म्हणून सांगितलं, जास्त वेळ थांबायचं असेल तर गाडीचे इंजिन बंद करा. पण बंद करताना हे लक्षात ठेवा. की आपले इंजिन चालू होणार आहे की नाही ते. आपल्या गाडीच इंजिन चालू होण्याच्या स्थितीत असेल तर बंद करा नाहीतर चालू ठेवा.

एका ड्रायव्हरनी मला विचारले डेपोच्या आम्ही नेहमी गाडी चालवत नाही. तेल कस वाचतं. मी सांगितल तू गाडी जवळ यतो. गाडीच्या दरवाजाला नमस्कार करणे लगेच इंजिन स्टार्ट करतो. आणि जोरजोराने रेज करतो. तेल जळण्याचे काम सुरू असते. मग बाकीच्या सर्व गोष्टी बघायला तू सुरूवात करतो. आपला आयनर ठीक आहे की नाही. सिग्नलचा दांडा काम करतो की नाही. पुचला डिकस्टेशन बोर्ड लावला की नाही. काच साफ केली की नाही. कंडक्टर बॅगबॉक्स आणायला गेलेला असतो. तेल जळण्याचे काम सुरू असते. जवळच कँटिन असेल दोन चार उड्या मारून कटींग प्याला ही जातो. तेल जळण्याचे काम सुरू असते.

मी आपल्याला फळ्यावर करून दाखवतो. म्हणजे प्रत्यक्ष अनुभव येईल, कसं असतं ते एक तास एका जागेवर गाडी उभी केली आणि इंजिन आयलिग करणं चालू ठेवल तर दोन लिटर तेल खर्च होत. एक तास म्हणजे साठ मिनिटे बरोबर ना ? साठ मिनिटे एका जागी गाडी उभी केली आणि इंजिन चालू ठेवल तर दोन लिटर तेल खर्च होते. ह्याचा दहावा हिस्सा म्हणजे एक दशलक्ष भाग म्हणजे किती किती झाल ६० मिनिटे. एका जागी उभी केली. आणि इंजिन चालू ठेवले म्हणजे ऑईल टू किंवा २०० मिली तेल खर्च होते. ह्याचा अर्धा हिस्सा म्हणजे किती ३ मिनिट एका जागी गाडी उभी केली आणि आयलिग स्पीडमध्ये इंजिन चालू ठेवलं ऑइल वन म्हणजे १०० मिली. खर्च होतो. मी त्याला सांगितल आपल्या डेपोमधून रोज २ हजार गाड्या बाहेर पडतात. ह्यातील प्रत्येक गाडी डेपोच्या गेटवर ३ मिनिटे त्या स्थितीत चालू राहिली. तर ऑईल वन ह्या हिशोबाने २०० लिटर तेल बरबाद होते. कधी आपण विचार करतो का असा ? नाही करत. तरी एक ड्रायव्हर उठला. मला म्हणतो साहेब एवढी मोठी कंपनी २०० लिटरचा काय हिशोब करता ? असा विचारणारा ड्रायव्हर मिळाला. मी त्याला दिवसाला २०० लिटर महिन्याला दिवस किती झाले बघा ६०००. लिटर वर्षाला महिने किती ७२०० लिटर तेल डेपोच्या गेटवर आपण फुकट जाळल. त्याचा काही उपयोग झाला का ? गुणिले तेलाचा भाव म्हणजे लाखात पैसे येतील बरोबर आहे का ? हे आपण वाचवू शकतो. गावी जाऊन आल्यानंतर गाडी चेक करा गाडीच्या सीटवर बसा, अजून काही गोष्टी करून घ्या. इंजिन स्टार्ट करा, प्रेशर भरून दया. गाडी बंद करा. बस कंडक्टरने घंटी वाजवली की आपली गाडी आपल्या मार्गावर न्या. वाचू शकतो ना कुठलाही त्रास म्हणून मी सांगितले की डेपोच्या गेटच्या आतमध्ये सुध्दा तेल वाचवू शकतो. बाहेर वाचवू ते वेगळ. पण इतक्या बारकाईने आपण कधी विचारच करत नाही. त्यामुळे जळणाऱ्या तेलाचे प्रमाण हे

सारख वाढत चाललं असतं. तर त्या गोष्टीचा आपण जरूर विचार करा. त्याप्रमाणे उदयापासून जेव्हा आपण ज्यावेळेस काम करणार आहोत. तेव्हा गाडीचा चेकींग आधी करा मग गाडी सीटवर बसा. इंजिन स्टार्ट करा. तर आपण फार मोठ्या प्रमाणात तेल वाचवू शकतो. किमान एखादी गोष्ट ठरवली तर करू शकतो. एक उदाहरण देतो. महाभारतात भीष्माचार्यांच्या अंगात बाण घुसलेले आहेत. रक्तबंबाळ झालेले आहे. बाणाच्या शय्येवर झोपलेले आहेत. पण मनामध्ये एकच इच्छा की आता दक्षिणाय चालू आहे. उत्तरणाय आल्यावर मी प्राण सोडणार आहे. स्वत:च्या इच्छेवरती ते इतके दिवस जगू शकले.

तुम्ही कदाचित असे म्हणाल फार पाच हजार वर्षांपूर्वीची गोष्ट असेल, ते फार मोठे होते. जवळची आपल्या गोष्ट सांगतो. मुलुंड या ठिकाणी वाळिंबे नावाचे एक कुटुंब राहत असे. जो पती होता तो ८५ वर्षाचा होता स्त्री होती ती ८० वर्षाची होती. या पतीची तब्येत वारंवार बिघडत असे. आता जातो की उदया जातो अशी काही वेळेला स्थिती व्हायची. ह्याची जी पत्नी होती ती रोज देवासमोर बसायची आणि फक्त एकच मागण मागायची की परमेश्वरा आजपर्यंत मी तुझ्याकडे काही मागितलं नाही. फक्त माझी एकच इच्छा आहे की पतीच्या आधी मला घेऊन चल मला अहेवपणी जायचय मला सौभाग्यपणी जायचयं .अशी रोज प्रार्थना करायची एक दिवस असा उजाडला कुठल्याही परिस्थितीत पती जिवंत राहू शकत नाही. अशी स्थिती आलेली आहे. ती आपल्या मुलाला सांगते "जा जरा डॉक्टरला घेऊन ये, आज काही यांची तब्येत बरी दिसत नाही." मग मुलगा डॉक्टर आणायला जातो. ही बाई किंवा ती स्त्री पुन्हा देवापुढे बसते. आणि सांगते '' परमेश्वरा आता शेवटचा क्षण आता आहे. आता तरी माझी विनंती मान्य करणार आहेस की नाही ? अस म्हणून देवाला नमस्कार करते आणि नवऱ्याच्या कॉटजवळ येऊन बसते. त्या ठिकाणी खलास होते. मुलगा डॉक्टरला घेऊन येतो. आईला आवाज देतो. आई जिवंत नसते. डॉक्टर ज्या रोग्यावर जो काही उपचार करणार असतात त्या पतीवर उपचार करतात आणि निघून जातात. आणि पंधरा मिनिटांनी पती पण जातो. मानसिक इच्छा किती प्रबळ असते त्याच हे उदाहरण आहे. मी महाभारतातल एक उदाहरण सांगितलं, आणि आपल्या जवळचं उदाहरण सांगितल !

तेव्हा आपण माणूस आहोत तेव्हा आपण मनामध्ये ठरवलं की हे करायचे आहे तर ह्या गोष्टी होऊन शकतात. फक्त आपण ठरवल की नाही. मी हे करणार आहे तर ते जरूर होऊ शकते. चढावावर चढताना आणि चढावरून खाली उतरताना पाच गियरचा वापर करा. आपण गाडी घेऊन बाहेर जात असता, रस्त्यामध्ये एखादा मोठा घाट किंवा एखादी मोठी चढाव लागतो. आपल्याला टॉप गियरमध्ये आपली गाडी असते. टॉप गियरमध्ये आपली गाडी चढत नाही तेव्हा आपण थर्ड गियर घेतो. थर्ड गियर मध्ये चढत नाही तेव्हा आपण सेकंड गियर घेतो. आणि तो चढाव आपण पार करून जातो. आणि खाली उतरताना उतारावरती आपण काय करतो तर टॉपवर टॉप उतरण्याचा प्रयत्न करतो. ब्रेकच्या भरवशावर. काही महाभाग असे बघीतले आहेत की न्यूट्रल करून सुध्दा उतरणारे आहेत. पण आपल्या तेलाचे सुध्दा पर्सेंटेज वाढावे म्हणून अशा प्रकरे आपल्याला तेल वाचवायचे नाही . सुरक्षित ड्रायव्हर, ड्रायव्हिंग आणि इंधन बचत ही एका रथाची दोन चाके आहेत. सुरक्षित ड्रायव्हिंग केल्यास इंधन ही आपोआप वाचणार.

(क्रमश:)

**श्री. वि. ना. कोपरकर**

कळवा, ठाणे.

***

# ढासळते पर्यावरण

*गत वर्षीच्या नी. गो. पंडितराव वक्तृत्व स्पर्धेतील हे एक लक्षणीय भाषण. विद्यार्थी किती विचार करतात हे वाचून समजावे. - संपादक*

आदरणीय वि. वा. शिरवाडकर तथा कवी कुसुमाग्रजांची ही कविता आजच्या विषयाला किती समर्पक आहे बघा. कवितेचं नाव आहे 'अर्थ'

साक्षात सूर्यही विस्मित झाला,
पृथ्वीच्या मातीतील स्वयंसिद्ध प्रकाशाच्या
वसाहती पाहून.
सूर्य मंडळीतील सारे ग्रहही उद्गारले,
"आमच्या अर्थहीन यात्रेत
ही एकच,
तिच्यावर लखलखत आहेत
सनातन अर्थाच्या लक्षावधी दीपमाला."
आणि आज,
आमच्या हातातील करंट्या कुऱ्हाडी
परजल्या आहेत आम्हीच.
त्या दीपमाला, तो युगार्जित अर्थ
संहारण्यासाठी!

पृथ्वी! मानवाचे वस्तिस्थान! संपूर्ण सूर्यमालेत सजीवांचे अस्तित्व असणारा एकच ग्रह. त्या सर्व सजीवांमध्ये, वाचा असलेला आणि दोन पायांवर चालू शकणारा एकच-बद्धिमान मानव, म्हणजेच तुम्ही आम्ही आपण सगळेच. पण अशा बद्धिमान आणि शक्तिमान मानवासाठी निसर्गात आणि पर्यावरणात घडणाऱ्या इतर घटना थांबत नाहीत.

पर्यावरण! पर्यावरण म्हणजे नक्की काय हो? कोणताही सजीव निर्माण होणे, वाढणे आणि तो नाश पावणे या नैसर्गिक क्रिया पूर्ण व्हायला या सभोवतालच्या घटकांची गरज असते, त्यांना पर्यावरण म्हणतात. अशा घटकांचे तीन गट पडतात. माती, पाणी, हवा असे निर्जीव घटक, इतर जीव म्हणजे सजीव घटक आणि तापमान, आर्द्रता, आवाज, उत्सर्जन असे अमूर्त घटक. ह्या तीन घटकांचा एखादया जीवावरती होणारा एकत्रित परिणाम म्हणजे पर्यावरण. ह्या परिणामांचा अभ्यास जे शास्त्र करते. त्याला पर्यावरण शास्त्र म्हणतात. ह्या शास्त्राचा विस्तार एवढा मोठा आहे की अनेक विज्ञानं आणि ज्ञानशाखा त्यात सामावलेल्या आहेत.

शेती,
जीवनशास्त्र,
अर्थशास्त्र,
अर्थपुरवठा,
न्याय आणि कायदेशास्त्र,
पदार्थविज्ञानशास्त्र,
नितिशास्त्र,
संगणकविज्ञान,
रसायनशास्त्र,
तत्त्वज्ञान,
वैद्यकशास्त्र,
भूदशास्त्र किंवा भूपृष्ठशास्त्र,

राजकारण,

जनसंपर्क व्यवस्थापन,

अभियांत्रिकी,

आणि समाजशास्त्र, ही सगळी पर्यावरण शास्त्राच्या छत्रीखाली समाविष्ट आहेत.

जगप्रसिद्ध वैज्ञानिक आणि तत्त्वचिंतक अल्बर्ट आईनस्टाईन ने एका ठिकाणी म्हटलंय की, '' ह्या जगात फक्त दोनच गोष्टी अगणित आणि चिरंतन आहेत. पहिलं म्हणजे आपलं विश्व, आणि दुसरी गोष्ट म्हणजे तथाकथित बुद्धिमान माणसाचा मूर्खपणा !'' स्वतःच्या प्रगतीच्या नावाखाली, गेली १०० वर्षे आणि त्यातल्या त्यात २० वर्षे मानवाने पृथ्वीवर केलेले अत्याचार महाभयंकर आहेत. मानवाच्या अशाच कृत्यांमुळे पर्यावरणात होणारे संख्यात्मक आणि गुणात्मक बिघाड म्हणजेच 'ढासळते पर्यावरण !'

पण पर्यावरणाचा असा होणारा ऱ्हास आणि त्यात होणारा बिघाड आपल्याला नक्की कसा समजतो हो ? तर अशा बिघाडाचा अभ्यास आणि मोजमाप करण्यासाठी काही निकर्ष आहेत. त्यांना निर्देशक किंवा Indicators म्हणतात.

प्रदूषण,

मत्स्यव्यवसाय

जैविक साखळी

शेती

सांडपाणी आणि घनकचरा व्यवस्थापन,

आरोग्य

आणि स्वच्छता हे असेच काही महत्त्वाचे निर्देशक.

पर्यावरणाचे तीन घटक ज्या प्रकारे अवलंबून असतात त्याला परिस्थितिकी म्हणजे ecology म्हणतात. ह्या परिस्थितिकी त्रिकोणातला एक दुवा जरी तुटला तर त्याचा परिणाम शेती, अर्थकारण, नागरी सुविधा, समाज, व्यापार, जंगल वगैरेंवर कसा होतो ते आपण आता काही उदाहरणांतून बघूया.

सर्वप्रथम आपण ठाण्यातल्याच पाण्याच्या साठ्यांचं आणि तलावांचं उदाहरण घेऊया. दोन आठवड्यापूर्वीच आपण गणेशोत्सव साजरा केला. जिज्ञासा आणि होप सारख्या संस्थांनी गेली काही वर्षे समाजप्रबोधन करण्याचा प्रयत्न करूनसुद्धा दरवर्षीप्रमाणे ह्या वर्षीही गणेशमूर्तींचे विसर्जन तलावा मध्येच झालं. हीच परिस्थिति मुंबई शहराची. विसर्जनाच्या ह्या पद्धतीमुळे संपूर्ण समुद्रकिनारा निर्माल्य आणि भग्न गणेशमूर्तींनी तर सजून जातोच, पण मूर्तीमधली हानिकारक रसायनं आणि कुजलेलं निर्माल्य समुद्रात मिसळल्यामुळे बोटींची आणि कोळ्यांच्या जाळ्यांची विल्हेवाट लागते. प्रचंड प्रमाणात प्राणी, मासे, पक्षी आणि वनस्पती अशा जलचर सृष्टीचा नाश होतो आणि सर्वत्र दुर्गंधी फैलावते. आपल्या श्रध्देचा अतिरेक आणि वास्तवता समजून घ्यायची उदासीनता ह्याचाच हा परिणाम.

भारतभर गावा-गावांतून असलेल्या तळ्यांची आणि हौदांचीही हीच स्थिती आहे. ह्यापैकी अनेक साठे पक्षी आणि प्राण्यांसाठी अतिशय महत्वाचे आहेत. पण गेल्या काही वर्षात वाढत्या जनसंख्येमुळे आणि नळाच्या पाण्यामुळे आपल्यासाठी ह्या तळ्यांचं आणि हौदाचं महत्त्व आणि गरज कमी झाली आहे, पण आपल्याबरोबर ह्या पृथ्वीवर जगणाऱ्या इतरांचं काय ? ह्या साठ्यांची सध्याची स्थिती अतिशय दयनीय आहे. शहरी आणि औद्योगिक कचरा आणि सांडपाणी सोडण्याचं एक ठिकाण एवढचं काय ते महत्त्व आता ह्या तळ्याचं उरलंय, काहीचं रुपांतर तर आता बस-स्टॉप आणि हाऊसिंग कॉलनिज मधे केलं जातयं. अशा तळ्यांच रक्षण करण्यासाठी जी सरकारी खाती

आहेत त्यांच्याकडे आपल्या कामासाठी लागणारी प्राथमिक माहितीच उपलब्ध नाही. घरगुती उपकरणांचा वाढता वापर आणि तळ्यांच्या बचावासाठी कुठलाच कायदा नसल्यामुळे वन्य जीवनाची एक मूलभूत आधार यंत्रणाच नाहीशी होत चालली आहे.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारताची लोकसंख्या जवळ जवळ ६०० दशलक्षांनी वाढली असून आता तर आपण एक अब्जाचा आकडा पार केला आहे. शहरीकरणामुळे आता जमिनीवर इतका दबाव पडलाय की १९४७ नंतर ५३००० चौरस किलोमीटर जमीन शहरीकरणाने गिळंकृत केलीय. अहो पंजाबचं क्षेत्रफळसुद्धा ह्यापेक्षा कमी आहे. संख्या कमी झाल्यामुळे वन्यजीव नामशेष होतात. पण काही तज्ञांच्या मते आपली वाढती लोकसंख्याच मानवाच्या नाशाचं कारण ठरेल.

अभयारण्यं आणि राष्ट्रीय उद्यानांवरही शहरीकरणाचा वाईट परिणाम झालाय. संजयगांधी राष्ट्रीय उद्यान आणि ओरिसातील भितरकनिका अभयारण्याची स्थिती ह्याची जिवंत उदाहरणं देतात. Borivali National Park मध्ये गेल्या काही वर्षात ३३००० कुटुंबांनी २०० हेक्टर जमिनीवर अतिक्रमण केलयं, प्रत्येक कुटुंबासाठी जर पाच माणसं धरली तर हा आकडा १,६५,००० पर्यंत जातो. झोपड्यांबरोबर बंगलेही आता इथे प्रगट व्हायला लागलेत. दुर्दैवाची गोष्ट अशी की कोर्टाचा आदेश असूनसुद्धा राज्य सरकार ह्या जमिनीची दखल घेऊ इच्छित नाही.

भितरकनिका अभयारण्याची स्थितीही इतकीच लाजिरवाणी आहे. हे अभयारण्य नदीमुखात राहणाऱ्या मगरींचं निवासस्थान आणि भारतातील दुसऱ्या क्रमांकाचं सर्वात मोठं दलदली जंगल आहे आणि रिडली कासवांची जगातील सर्वात मोठी वसाहत सुद्धा इथेच आहे. तरीही गेल्या काही वर्षात जवळ जवळ ३५००० लोकांनी इथल्या ३५० चौरस किलोमीटर परिसरावर अतिक्रमण केले आहे. आवाज उठवणाऱ्याला सतत हारच पत्करावी लागत आहे. आवाज उठवणाऱ्या अधिकाऱ्यांची तत्परतेने बदली केली जात आहे. आपल्या देशाचा अनमोल ठेवा असलेल्या राष्ट्रीय उदयानांच्या आणि अभयारण्यांच्या भवितव्यावर असलेल्या टांगत्या तलवारीची ही झाली फक्त दोन उदाहरणं.


अशी परिस्थिती फक्त भारतातच आहे असं नाही बरं का ! हे सगळं घडतं ते फक्त भरतात आणि इतर देशांत आलबेल असं नाही, तर अतिविकसित देशांत त्यांचं तंत्रज्ञान आणि औद्योगिक विकासच ढासळत्या पर्यावरणाचं कारण ठरतोय. कारण World Health Organisation च्या माध्यमातून विकसनशील देशांवर आज निर्बंध लावणाऱ्या याच देशांनी काही वर्षांपूर्वी निसर्गावर असेच अत्याचार केलेत.

शहरं, ग्रामीण विभाग, उदयोग धंदे, रस्ते, पर्वतराजी, डोंगर रांगा, जंगलं, नदया आणि समुद्रकिनारे. पर्यावरणाचा ढासळता बुरुज कुठे-कुठे सांभाळायचा ? स्थानिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, प्रत्येक पातळीवर समस्यांचा राक्षस शिंग रोखून उभा आहेच. कोण-कोण जबाबदार आहे हो याला ? निष्क्रीय, उदासीन आणि अंधश्रद्धेचा बळी ठरणारी सामान्य जनता ? अभयारण्यात जाऊन मोर आणि हरणांच्या मेजवान्या झोडणारे ऐतखाऊ राजकारणी आणि अभिनेते ? या सगळ्यांकडे डोळेझाक करणारे कायदयाचे रक्षक ?कायदयांतील त्रुटी आणि न्यायदानातील विलंबामुळे प्रभावशून्य आणि दुबळी ठरलेली न्यायव्यवस्था ? नियोजनशून्य आणि दूरदृष्टीचा अभाव असणारे सरकारी अधिकारी ?ह्यातला प्रत्येक जण जबाबदार आहे.

मित्रांनो ज्ञानेश्वरांनी सांगितलेल्याप्रमाणे आपली कृती स्थानिक आणि प्रतिसाद वैयक्तिक असला पाहिजे. प्लॅस्टिक बॅगवर बंदीचे सरकारी धोरण आणि त्याची अंमलबजावणी, सरकारी यंत्रणेचा योग्य वापर केल्यास तो किती परिणामकारक ठरू शकते, हे आपण अलिकडेच पाहिले. अशाच खंबीर धोरणांची आता आम्हाला अपेक्षा आहे. एक चंद्रशेखर ठाण्यात, एक मेधा पाटकर गुजरातेत, एक सुंदरलाल बहुगुणा हिमाचल प्रदेशात, एक हिरेमेठ कर्नाटकात, एक खैरनार मुंबईत, एक अण्णा हजारे अहमदनगरामध्ये भ्रष्ट व्यवस्थेच्या विरोधात खंबीरपणे उभे राहतात आणि परिस्थिती बदलतात. अशीच तुमची आमची खंबीर मनं ढासळते पर्यावरणही रोखू शकतील. प्रचंड इच्छाशक्ती, कणखर संघटना आणि संशोधन वृत्ती इतक्या शिदोरीवर आपल्याला हे सगळं बदलायचंय. पण प्रथम आपण ढासळलेल्या समाजमनाला सावरूया आणि पर्यावरणाकडे वळूया !

**आदित्य अरुण फडके.**
११ अमिता सोसायटी, ४था मजला,
कान्होजी आग्रे मार्ग,
कोलडोंगरी गल्ली २, अंधेरी (पूर्व) मुंबई ४०० ०६९.

•••



वाढदिवस

(पान क्र. १६ वरून)

वयाला जाणीवपूर्वक चढायला शिकवायला हवी. मुले स्वप्नाळू असतात. खोट्या आशा आकांक्षा न दाखवता त्यांना वास्तवतेचे भान असणे आवश्यक आहे. मुलांनी वाढदिवसाला नुसती अपेक्षा न करता काहीतरी वाढत्या वयानुसार करून दाखवणे आवश्यक आहे.

या लेखाच्या शेवटी मी एक छोटी गोष्ट नमूद करत आहे. हिल्टन नावाचा एक गुराखी होतो अतिशय गरीब घरातील. मुलगा ते जेव्हा जेव्हा शहरात जात तेव्हा तेव्हा त्याला हॉटलची ओढ वाटे. प्रत्येक वेळी त्याचे वडिल त्याला जाणीव करून देत अरे साध्या हॉटेलमध्ये चहा पिण्याइतकीही आपली परिस्थिती नाही. तसेच स्वप्न तो उराशी बाळगून होता. त्याच्या चौदाव्या वाढदिवसाला त्याच्या वडिलांनी त्याला एका 'फाईव्ह स्टार' हॉटेल दाखवायचे कबूल केले. वडिल त्या हॉटेल मॅनेजरशी बोलले 'आमची या हॉटेलमध्ये काही खाण्यापिण्याची ऐपत नाही. फक्त माझ्या मुलाला हे हॉटेल दाखवा'. मॅनेजर स्वभावाने चांगला होता. त्याने हिल्टनला संपूर्ण हॉटेल, अगदी कानाकोपरा दाखवला आणि त्याची माहिती सांगितली. हिल्टनला हे सगळचं नवीन होत. पण त्याचा उत्साह दांडगा होता. तो खुश होता. हॉटेलमधून निघाल्यावर तो वडिलांना म्हणाला ' One day I am going to own this Hotel ' वडिलांना वाटले आपण एवढे गरीब हा काय करणार आहे. पण आज जगात पंचावन्न हिल्टन हॉटेलस् आहेत. त्या हॉटेल सकट. कारण हिल्टनला त्या चौदाव्या वाढदिवसाचा विसर पडला नव्हता.

म्हणूनच वाढदिवसाला नुसत्या अपेक्षा न करता वाढत्या वयानुसार जबाबदारी ओळखून वागायला शिका.

**सौ. वंदना सं. प्रसादे**
ठाणे (प) ५४० ०६५२

# घरातच सिद्धिविनायक

*आपल्या घरातच आपण पूजा केली तर घरात मंदिराचे समाधान मिळू शकते. त्यासाठी धर्माचे व भक्तीचे प्रदर्शन करणाऱ्या रांगांचीच गरज आहे का ? - संपादक*

लोकसत्ता गुरुवार दि. २४ जानेवारी २००२ च्या लोकमानस मधील 'चीड' येते, पण ... हे एका त्रस्त मुंबईकराचे पत्र वाचले. अनेक मुंबईकरांच्या व देवालयांमुळे, मठांपुढे रांगा लावणाऱ्या लोकांच्या मनांचे प्रतिबिंबच या पत्रात उमटले आहे. अनेक देवालयांत मठात येणारा हा एक प्रतिनिधिक अनुभव आहे.

मला नेहमी हा प्रश्न पडतो की देवालयांपुढे किंवा कोण्या बाबांच्या मठांपुढे एवढ्या रांगा लोक लावतातच का ? देवळात, मठात माणसं जातातच का ? मनःशांतीसाठी, का दर्शनाने मनोकामना पुऱ्या होतात म्हणून. ज्याची जी मागणी, इच्छा असेल ती पुरी व्हावी म्हणून ? मग चिडचिड होऊन सुध्दा काही पदरात पडेल या श्रध्देने माणूस तिथेच पुन्हा पुन्हा जातो. उभा राहतो मन मारून. साऱ्या कटकटी, गलबला, कोलाहल सहन करीत देवापर्यंत पोचतो. गर्दी गर्दीत दर्शन घेतो. इच्छा बोलायला, देवाशी संवाद करायलाही वेळ नाही. मग कुठली मनःशांती, कुठल्या मनोकामना पुऱ्या होतात ?

मग अशा वेळी दलालांमार्फत फुलवाल्यांमार्फत, किंवा जादा पैसे देऊन स्वतंत्र रांगा लावून कसेबसे दर्शन मिळाल्याचे खोटे समाधान मानणे, त्याबद्दल प्रौढी मिरविणे यात माणसाची कोणती आध्यात्मिक उन्नती होते ? किंवा मनःशांती मिळते अगर इच्छा पुऱ्या होतात ? एक निरर्थक उपचार एवढेच या दर्शनाचे स्वरुप.

देवळांपुढे, मठांपुढे दर्शनासाठी, रांगा लावून या देवस्थानांना मठांना ऐश्वर्यसंपन्न बनविण्यास व त्यामुळे विकृत बनविण्यास हातभार लावण्यापेक्षा प्रत्येकाने आपल्या घरातच, देवालयातील उपास्य देवतेचा अगर मठातील बाबांचा फोटो देव्हाऱ्यात ठेवावा. सकाळ-संध्याकाळ पूजा आरती यथासांग करावी. घरातील सर्व मंडळींनी सायंकाळी एक वेळ ठरवून मंगल आरती, पूजा, नैवेद्य करावा. आजूबाजूच्या लोकांना बोलवावे किंवा बाजूच्या घरात प्रसाद द्यावा. घरातील प्रत्येक मिळवत्या व्यक्तीने देवापुढे रोज एक रुपया दक्षिणा ठेवावी. अशी जमलेली रक्कम महिनाअखेर (ही रक्कम चांगली मोठी जमते) शाळा, वाचनालये, अपंग अथवा अनाथगृहांना द्यावी. सर्वच भक्तांनी हा नियम पाळल्यास सरकारकडे भीक मागण्याची या संस्थांवर वेळ येणार नाही.

अनेक देवालयांच्या, मठांच्या ट्रस्टमधून अशी रक्कम सार्वजनिक संस्थांना देण्यात येते. पण यासाठी विश्वस्तांचे हात ओले करावे लागतात असा अनुभव येतो. देवस्थानांना मठांना श्रीमंत बनविण्यापेक्षा, दानाने स्वतः श्रीमंत (मनाने) होता येते. मनःशांती लाभते. घरातील पूजा-आरतीने घरात सुखशांती नांदते. पुढील पिढीवर चांगले संस्कार घडतात व घरातील मंगलमय वातावरण आजूबाजूला पसरते.

तेव्हा चिडीने देवळांपुढे, मठांपुढे रांगा लावण्यापेक्षा, वैतागून उभे राहण्यापेक्षा, प्रत्येक व्यक्तीने आपले घरच सिद्धिविनायक मंदिर, मठाएवढी पवित्र वास्तू बनवावे. घरात सुखशांती आणावी. मग आपोआपच मनःशांती लाभेल.

इतके करूनही मनःशांती न मिळाल्यास आपणास मनोविकार तज्ज्ञाची गरज आहे हे जाणून मानसोपचार करून घ्यावेत.

**विश्वनाथ शेंड्ये**
पार्वती सदन, जांभळी नाका,
जुना मुंबई रस्ता, ठाणे -४०० ६०१.

# मृत्यूशय्येवर असणाऱ्या कॅन्सर रुग्णांची सेवा करणारे सिप्ला कर्करोग परिहार सेवा केंद्र - वारजे, पुणे.

*पुण्यानजिक वारजे येथे असणाऱ्या एक वेगळ्या सेवा केंद्राचा हा परिचय दिशा च्या वाचकांसाठी मुद्दाम देत आहोत.*
*- संपादक.*

पुण्यापासून सुमारे १०-१२ किलोमीटरच्या अंतरावर असणाऱ्या वारजे या गावी नवीनच स्थापन केलेले सिप्ला कर्करोग परिहार सेवा केंद्र खरोखरच अनुकरणीय आहे. मरणाच्या दारात उभे असलेल्या कर्करोगग्रस्त रुग्णांची, मोफत उपचार करुन त्यांची सेवा करणारे हे केंद्र म्हणज एक 'हॉलिडे-रिसोर्ट'च आहे, हे प्रत्यक्ष बघून आल्यानंतर वाटते. येथील रम्य वातावरण, हसतमुख डॉक्टर्स, परिचारिका, कर्मचारीवर्ग यांचे प्रेमाने आपुलकीने भारलेले वातावरण पाहून पेशंटच काय ! पेशंटला भेटायला येणारे त्यांचे नातेवाईक सुद्धा क्षणभर हे हॉस्पिटल आहे हे विसरूनच जातात.

१ मे १९९७ या दिवशी चालू झालेल्या या परिहार सेवा केंद्रात, आतापर्यंत हजारावर कर्करोगग्रस्त रुग्णांनी येथील सेवेचा लाभ घेतला. सिप्ला कॅन्सर फाऊंडेशन या संस्थेने, एक केंद्रीय निधी उभारून एका विश्वस्त संस्थेची स्थापना करून सुमारे पाच कोटी रुपयांचा हा प्रोजेक्ट उभा केला. त्याकरता बहुतांश इंजिनिअर्सनी विनावेतन काम केले. केवढा हा प्रचंड त्याग, ह्याच प्रचंड शक्तीवर आज हे परिहार सेवा केंद्र उभे आहे. परिहार सेवा म्हणजे (Pallialitive Care) जागतिक आरोग्य संघटनेने म्हटल्याप्रमाणे - "असाध्य रोग झालेल्या रोग्याची परिपूर्ण आणि वास्तव काळजी, रुग्णाच्या शारिरीक सामाजिक, भावनिक आणि आध्यात्मिक गरजांची पूर्ती करण्याचा प्रयत्न" अशा या परिहार प्रयत्नांनी मृत्यू जवळ येत नाही, पुढे ढकलला जात नाही, टाळता येत नाही. फक्त या केंद्रामुळे उर्वरीत आयुष्य सुसह्यपणे जगण्याची जिद्द वाढविता येते. ती सुद्धा यातना कमी करून, हा दिलासा देणारे हे महाराष्ट्रातील एकमेव विनामूल्य सेवाकेंद्र आहे.

'शेवटचा दिस गोड व्हावा' ह्या उदात्त हेतूने स्थापन केलेले हे केंद्र म्हणजे कर्करोगग्रस्त रुग्णांना त्यांचे उरले सुरले कष्टमय, दुःखप्रद जीवन आत्मविश्वासाने, आनंदाने आणि धैर्याने जगण्याचा दिलासा देणारे हात ह्या संस्थेच्या रुपाने पुढे आले आहेत. या केंद्रात सध्या पन्नास खाटांची सोय आहे. विशेष म्हणजे येथील नर्सेसना युनिफार्म नाहीत. साध्या वेशातील घरगुती वातावरणात परिचारिका सेवा करताना पाहून रुग्णांना आपल्या घरातल्यापैकीच कुणीतरी आपली सेवा करते आहे असे वाटते. ह्याच मानसिक आधारावर येथील रुग्ण समाधानी होऊन त्यांच्या यातना कमी होऊ लागतात. रुग्णासोबत त्याच्या फक्त एका नातेवाईकाला इकडेच राहण्याची सोय केंद्राने अतिशय सुंदर अशा हॉलमध्ये केली आहे. पुरुषांसाठी आणि बायकांसाठी वेगवेगळी व्यवस्था, ती सर्व सोयींनी परिपूर्ण आहे. कोणते उपचार कसे करायचे, काय काय पथ्ये पाळायची, काय काय काळजी घ्यायची, याचे प्रशिक्षण या नातेवाईकांना सुध्दा दिले जाते. कारण घरी गेल्यावर त्या त्या पध्दतीने त्याच्यावर उपचार करणे आवश्यक असते. केंद्रात प्रवेश घेतलेल्या रुग्णांसाठी सर्व उपचार, सोयी, व औषधे संपूर्णपणे 'विनामूल्य' दिली जातात. ही सर्व सेवा रुग्णांच्या मृत्यूपर्यंत दिली जाते.

अतिशय रम्य असा हा परिसर उभारून निसर्गतःच असलेल्या टेकडीचा उपयोग तिथेच निसर्गरम्य

बाग फुलझाडे, चित्रे, शिल्पे यांनी तो नटवून सजवला आहे. 'गुलाब, शेवंती, अबोली आणि मोगरा' अशी येथील रुग्णांच्या वॉर्डांची नामकरणे केली असून त्या त्या वॉर्डांच्या बाहेरच नावाप्रमाणे फुलांची सुंदर बाग बनवून ती नावे सार्थ केली आहेत. एकूण वातावरण अप्रतिम, स्वच्छ, शिस्तीचे त्याबरोबर आपुलकीचे आहे. भयानक, धास्तावलेल्या रुग्णांचे अल्पावधीतच एक/दीड किलो वजन वाढल्याचे आणि प्रसन्न मुद्रेत रुपांतर झाल्याचे आढळून येते. कोणत्याही रुग्णाशी तुम्ही मोकळे पणाने बोलू शकता. तुम्हाला त्यांच्या भावमुद्रे शिवाय शब्दातून सुद्धा दिलाशाचा प्रत्यय तावडतोब मिळतो. याशिवाय अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे येथील रुग्णांचे मनोधैर्य, आत्मबल, आत्मशक्ति, मानसिकता सुधारण्याकरता अनेक प्रयोग केले जातात. योग प्राणायाम, यांच्याबरोबर, चित्रे काढणे, फुले बनवणे, हस्तकलेच्या वस्तू बनवणे, बागकाम करणे अशा विविध छंदात या रुग्णांना केंद्रीभूत केले जाते. काही भजनी मंडळे येऊन निरनिराळे विविध भाषी कार्यक्रम करून रुग्णांच्या मनोरंजनाबरोबरच त्यांचे आत्मिक मनोबल वाढवायचा यशस्वी प्रयत्न करतात. संगीताचे सुद्धा विविध कार्यक्रम, शास्त्रोक्त, नाट्यसंगीत, भक्तिसंगीत, भावगीतांचे कार्यक्रम महिन्यातून चार-पाच वेळा तरी चालू असतात. एका मोठ्या करमणुकीच्या हॉलमध्ये सर्व रुग्णांना एकत्र आणले जाते. ज्याला चालणे शक्य नसेल त्यांना कॉटसकट (फिरत्या चाकांच्या), ह्या हॉलमध्ये झोपूनच कार्यक्रमाला आणले जाते. याशिवाय समर्थांचे दासबोध पारायण नित्यनेमाने चालूच असते.

सध्या या केंद्राच्या आरोग्यप्रमुख म्हणून डॉ. अनुराधा सोवनी ह्या असून संस्थेच्या वतीने इंग्लंडमध्ये या विषयाकरता खास प्रशिक्षण घेतले आहे. डॉ. दीपक जोगळेकर हे पूर्ण वेळ आरोग्यसेवा सांभाळतात. तसेच चाळीस वर्षे सिप्ला कंपनीत काम केलेले श्री. नरेंद्र राजे हे प्रमुख व्यवस्थापक म्हणून काम करतात. शासकीय संचालक प्रमुख म्हणून एक रिटायर्ड लेफ्टनंट कर्नल श्री. आर. मुखर्जी काम पहातात. श्री. राजे यांच्याशी वार्तालाप करताना त्यांनी ही परिहार सेवा फार दूरवर पोचवायची इच्छा व्यक्त करून, केंद्राला डॉक्टर्स, परिचारिका, वैद्यकीय सेवा करणारे सामाजिक कार्यकर्ते, कॅन्सरग्रस्त पेशंटचे नातेवाईक, स्वयंसेवक, या सर्वांची नितांत आवश्यकता आहे हे सांगितले. परिचारीकांकरता खास प्रशिक्षण वर्ग सुरु केला असून एस्. एस्. सी. पर्यंत शिकलेल्या तरुण युवतींना त्यांनी आवाहन केले आहे. ज्यांची समाजसेवा करायची खरोखर इच्छा असेल, तळमळ असेल, त्यांनी खाली दिलेल्या पत्त्यावर व माहितीनुसार संपर्क साधावा. तद्वतच ज्यांना काही हस्तकलेची कला अवगत असेल त्यांनीसुद्धा आपल्या कलेचे शिक्षण रुग्णांना दिल्यास त्यांच्या मनोरंजनाबरोबरच वेळेचा सदुपयोग होऊन रुग्णांना दिलासा दिल्याचे श्रेय मिळेल. काही निवृत्त ज्येष्ठ नागरिक या संस्थेमधून स्वतःहून काम करताना दिसतात. ते स्वयंसेवक म्हणून ह्या संस्थेतर्फे पुण्यांतील निरनिराळ्या सरकारी हॉस्पिटलात (ससून, के. ई. एम. वगैरे) जाऊन तेथील कॅन्सरग्रस्त रुग्णांना भेटतात, त्यांच्या नातेवाईकांना ह्या केंद्राची माहिती देतात. रुग्णवाहिनीची सोय करून पेशंट तयार झाल्यास त्याला इकडे प्रवेश मिळवण्याकरता सहाय्य करतात. अशा स्वयंसेवकांची सुद्धा संस्थेला खरी गरज आहे.

'केअर बियॉंड क्युअर' (Care beyond care) हे ब्रीद वाक्य असलेली कमलासारख्या दोन हातांची ओंजळ म्हणजे धगधगणाऱ्या दिव्यांना त्यांच्या वातीची काजळी काढून टाकून पुन्हा तेल घालून उजळण्याची आणि पुन्हा प्रकाशमान 'ज्योत दिव्याची मंद तेवत' ठेवणारी ही संस्था आहे. ती अत्यंत बहुमोल असे प्रामाणिक कार्य करत आहे.

रुग्णांच्या शारिरीक अवस्थेवर अवलंबूनच औषधोपचार केले जातात. या उपचाराचे वेदना कमी होत जाऊन, शेवटी रुग्ण आपली शारिरीक, मानसिक, बौध्दिक स्थिती सुधारून मरणाच्या वेळी नातेवाईकात आनंदाने राहू

शकतो. स्वतःच्या जीवनाचा अंत जवळ आलेला असताना रुग्णांच्या सेवेमध्ये हरप्रकारे विनामूल्य सेवा करणारे हे महाराष्ट्रातले एकमेव केंद्र आहे. त्या केंद्राला अनेक हातांची आज गरज आहे. 'थेंबे थेंबे तळे साचे' या उक्तीप्रमाणे, तहानलेल्या ओठांवर पाण्याचा एक थेंब जरी पडला, तरी त्याची महानता त्यालाच कळते, जाणवते, तद्वतच तुमच्या एका थेंबामुळे संस्थेला शीतलता येऊन हे रोपटे वाढीस लागेल आणि ह्या महान कार्याला फुलाची पाकळी बनून तुमचा हातभार लागेल. माणुसकीचा हा झरा ह्या केंद्रात सतत वाहात असतो त्याचा प्रत्यय आपण इकडे सहज चक्कर मारली असता जाणवते.

एका रुग्णाने व्यक्त केलेले काव्यरुपी उद्‌गार बरेच काही सांगून जातात.

"पुसणार कोणी असेल तर<br>
डोळे भरून यायला अर्थ आहे ।<br>
कोणाचे डोळे भरणार नसतील<br>
तर मरण सुध्दा व्यर्थ आहे" ॥

सोबत संस्थेच्या माहिती पत्रकाचा गोषवारा आणि संपर्क पत्ता/दूरध्वनीसह पुढे देत आहे. खासकरून मुंबई/ ठाणे/कल्याण/नाशिक या परिसरातील ज्यांना ह्या संस्थेची माहिती नव्हती त्यांच्याकरता -

> ह्या केंद्रामधे फक्त कॅन्सरच्या शेवटच्या टप्प्यातील रुग्णांना दाखल करता येते. रुग्णास दाखल करण्यास आणण्यापूर्वी रुग्णांचे सर्व उपचाराचे सर्व कागदपत्र केंद्राच्या डॉक्टरांना सकाळी ९ ते दुपारी ३.०० ह्या वेळात कामकाजाचे दिवशी केंद्रात आणून दाखवावे.

''सिप्ला कॅन्सर परिहार सेवा प्रतिष्ठान'' हा प्रकल्प भारत सरकारच्या अधिनियम (80 G) प्राप्तिकर १९६१ या अन्वये मान्यताप्राप्त असून, संस्थेस दिल्या जाणाऱ्या मोठ्या देणगीवर प्राप्तीकर पूर्णपणे माफ आहे. ही संस्था सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंद झालेली आहे. 'सिप्ला कॅन्सर अँड एडस् फौंडेशन' या नावाने चेक स्वीकारला जातो.

**मोफत परिचारिका शिक्षण -**

सिप्ला फाऊंडेशनच्या -हमीद इन्स्टिट्यूटतर्फे नर्सिंगच्या मदतनीसाचे प्रशिक्षण विनामूल्य आहे. दहावी पर्यंत शिकलेल्या मुलींसाठी प्रथम ३ महिने प्राथमिक व नंतर १० महिने मदतनीस परिचारिकेचे शिक्षण २ महिन्याच्या वॉर्डमधील कामाच्या अनुभवासह दिले जाते. शिक्षण पूर्ण झाल्यावर सर्टिफिकेट देण्यात येते. अधिक माहितीसाठी लिहा.

डायरेक्टर एज्युकेशन, सिप्ला कॅन्सर परिहार सेवाकेंद्र,<br>
पुणे बंगलोर हायवे, पुणे -४११ ०२९.<br>
दूरध्वनी सेवा : (०२०) ५४६५७४४/५४६६८३५

पी. एम. टी. बससेवा क्रमांक - ८०<br>
**डेक्कन जिमखाना ते सिप्ला सेंटर:**<br>
स. ६.३५, ९.१५, दु. १२.२५, ३.३० सायं. ६.१०

**सिप्ला सेंटर ते जिमखाना** : स. ७.१०, ९.५०, दु. १.००, ४.०५, सायं. ६.४५

**सुरेश. श. देशपांडे**<br>
१/२ जान्हवी अपार्टमेंट,<br>
चरई, ठाणे - ४०० ६०१.<br>
दूरध्वनी : ५४३ ०९९८

***

# सदाचरण म्हणजेच खरा मानवधर्म

*मनाला पटतील, भावतील असे धर्म व तत्त्वज्ञान संदर्भातील विचार या लेखात व्यक्त केले आहेत. - संपादक*

**धर्मांची व्याख्या -**

प्रथम आपण धर्म म्हणजे काय ते पाहू. आपल्या वेदांत ऋग्वेद हा सर्वात प्राचीन आहे त्यात धर्म हा शब्द मिळतो. प्रत्येक प्राणी मात्राला-एवढेच नव्हे तर पदार्थालाही धर्म असतो. पदार्थांच्या धर्माला गुणधर्म म्हणतात. आचार प्रसवो धर्म, धारणाध्दर्ममित्याह धर्मो धारयाति प्रज्ञा, धर्मो रक्षतिः या धर्माच्या व्याख्या आहेत. दुसऱ्यावर उपकार करणे, दया करणे हा मानव धर्म आहे. हिंदुधर्म हा मानवतेला आणि अध्यात्मिक जीवनाला आधारभूत आहे. म्हणूनच त्याला मानव धर्म म्हणतात.

मनुष्य हा विवेकशील प्राणि आहे. इंग्रजीत म्हटले आहे की, Man is a rational animal आहार, निद्रा, भय, मैथनंच सामान्यमेतत् पशुभिर्नराणाम् धर्मो ही तेषांमधिको विशेषो धर्मेण हीना पशुभिः समानः याचा अर्थ-खाणे, पिणे, झोप मृत्युचे भय प्रजोत्पत्ति याच बाबतीत मनुष्य आणि पशु दोघे समान आहेत. परंतु मनुष्यात विवेक, विचार स्वसंवेद्यता हे गुण जास्त आहेत म्हणून स्वतः त्याने आपली प्रगती केली आहे व करीत आहे. धर्म, अर्थ, काम या चार पुरुषार्थाला आपल्या धर्मात सनातन कालापासून महत्त्व दिले गेले आहे. त्यानंतर मोक्षाला. दुसऱ्या पाश्चिमात्य राष्ट्रात अर्थ आणि काम हे दोनचं महत्त्वाचे आहेत म्हणून त्या देशांना वाईट परिस्थिती आली आहे. सदाचारयुक्त आणि नितीने रहाणे हे मानवतेचे लक्षण आहे. नीतीचा अभाव हे पशुत्वाचे लक्षण आहे. आता पर्यंत झालेल्या प्रत्येक युगांत त्या त्या वेळेच्या परिस्थितीनुरुप वेगवेगळे धर्म होते. सत्ययुगातला धर्म तपस्याप्रधान होता. त्रेतायुगात ज्ञानप्रधान होता. द्वापार युगात यज्ञप्रधान आणि आज कलियुगात दान आणि परोपकार हा धर्म आहे. याचा अर्थ आपण सदाचार संपन्न राहून इतर लोकांना मदत करावी असा आहे.

दया, क्षमा, सत्य, इंद्रियनिग्रह, शुचिता, अहिंसा, गुरुसेवा, निर्लोभता विनम्रता, ही जशी निर्तांची लक्षणे आहेत तशीच मानव धर्माची सुद्धा आहेत. याचा अर्थ नितीभूल्ये आणि धर्म यांची फारकत करता येत नाही कारण धर्म हा निती मूल्यावरच अधिष्ठित असतो. ईश्वरोपासना नंतर ज्यावेळीस नितीमूल्याची पायमल्ली होऊन अधर्माचे साम्राज्य प्रस्थापित होते, त्यावेळेस परमेश्वर अवतार घेऊन धर्माची पुन्हा स्थापना करतो असे म्हणतात. पहा-यदा यदा ही धर्मस्य ग्लानिर्भवती भारत ! अभ्युत्यानमधर्मस्य-तदा त्मानम् सृजाम्यहम् ।। गीता हिंदुचा धर्म ग्रंथ आहे समस्त वेदांचे व उपनिषदांचे सार श्री महभागद्दीतेद्वारा भगवान श्री कृष्णाने अर्जुनला उद्देशून विशद केले आहे. गीता ग्रंथातील तत्त्वज्ञान भारतीयांप्रमाणेच जगातील इतर विद्वानांनाही मार्गदर्शक ठरले आहे. कारण गीतेतील मूलभूत तत्त्वज्ञान वैश्विक असून त्या तत्त्वज्ञानाची मानवी व्यवहाराशी वेगवेगळ्या योगांतून सांगड घातली आहे. निष्काम कर्मयोग आचरून जीवन सुखी कसे करावे हे गीतेतील महान तत्त्वज्ञान लोकमान्य टिळकांनी गीतारहस्य ग्रंथ लिहून पटवून दिले आहे.

**धर्म आणि संस्कृती-**

भारतीय संस्कृतीला जर मानस सरोवराची उपमा दिली तर त्यात विहार करणाऱ्या हंसाला धर्माची उपमा योग्य आहे. धर्म संस्कृतिशी निगडित आहे. धर्म व्यक्तिने प्रथम आचरणात आणायचा असतो नंतर व्यापक स्वरुपात समाज तसा बनतो. नंतर आपली संस्कृती बनते. ती

देशव्यापी असते. त्यात देशातील विविध भाषा, विचार, चालीरीती प्रार्थना पद्धती, पोशाख-इतिहास आणि नितीमूल्ये ह्या गोष्टी प्रामुख्याने असतात त्या वंशपरंपरेने चालत असतात, जेव्हा एका मानवाचा दुसऱ्या मानवाशी अगर समाजाशी संबंध येऊन जो नितीनियमांचा आदर करून वागतो, त्यास संस्कृत मानव म्हणतात. परंतु आज अत्यंत खेदाची गोष्ट आहे की आपली भारतीय संस्कृति सर्वात प्राचीन असून सर्व जगाला दिपस्तंभप्रमाणे मार्गदर्शन करीत असूनही तिचा दिवसें दिवस ऱ्हास होत चाललेला आहे व एक नवीन भोगवादी संस्कृती उदयाला येत चाललेली आहे व नितीमूल्यांची घसरण होत आहे. ह्या गोष्टींची कोणालाच खंत वाटत नाही. कारण आता यापुढे ही नवीन पिढी येणार आहे तिला धर्म आणि संस्कृतिह्या गोष्टी टाकाऊ वाटतात. त्यांची बंधने त्यांना नको आहेत. कारण ती भौतिक सुखाच्या व स्वैराचारच्या आड येतात. विनाशी जड शरिराचे लाड पुरविण्यातच दंग होऊन त्यातील चैतन्याला आपण विसरलो आहोत त्यामुळे त्याही पलिकडे काही अलौकिक आणि दिव्यशक्ति आहे याचा शोध आम्ही घेत नाही. कारण शाळा सुशिक्षित किंवा सुसंस्कृत म्हणता येणार नाही याल कारण शाळा कॉलेजातून धर्म आणि नितीमूल्यांचे शिक्षण आमच्या मुलांना मिळाले पाहिजे व राष्ट्राची भावी पिढी सुसंस्कृत झाली पाहिजे ह्याची आपल्या राज्यकर्तांनाही गरज वाटत नाही.

संस्कृती प्रमाणेच संस्कार ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. व्यक्तिवर सुसंस्कार होण्याला फार कालवधी लागतो कैक पिढ्यांचाही तो वारसा असू शकतो. त्या शिवाय त्याचे आजूबाजूची परिस्थितीही कारणीभूत होऊ शकते. पूर्वी सांगितलेच आहे की ह्या गोष्टींना बराच कालावधी लागतो आपली महाकाव्ये लोकगीते, धर्म-तत्त्वज्ञान भाषा, वाङ:मय, इतिहास लेण्यातील खोदीव-कोरीव कामे देवतांच्या मूर्ती मंदिरे शिल्पकला, गायनकला, नृत्यकला यातूनच कालांतराने आपली संस्कृति साकार होऊन उदयाला येत असते. देवाण घेवाण केल्याने वाढते जर आपण आपल्या संस्कृतिची द्वारे आपल्यालाच बंद केलीत तर काळाच्या उदरात अशा संस्कृति नष्ट होत असतात जसे ग्रीक, रोमन वगैरे संस्कृति नष्ट झाल्यास तशीच आपली इतिहास पूर्व कालीन संस्कृतीही नष्ट झालेली आहे.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर 'धर्म' शद्बावर अनर्थ ओढवला आहे. आपल्या देशाच्या राज्य घटनेत भारत हा सेक्युलर (Secular) देश आहे असे मानण्यात आले आहे. त्याचमुळे नेहमी 'धर्मनिरपेक्षता', 'सर्व धर्मसमभाव' असे वेगवेगळे शद्ब प्रयोगही केले जातात. म. गांधीनी सत्य अहिंसेलाच आपल्या जीवनात महत्त्वाचे स्थान दिले होते आणि आयुष्यभर त्यांनी त्यांचा पाठपुरावा केला. सत्य हेच हिंदू धर्माच्या मूळ तत्वाशी आहे त्यालाच आम्ही परमेश्वर मानतो. 'ऋतं वच्मी, 'सत्यं वच्मी', 'सत्य मेव जयते' ही ब्रीद वाक्य आपल्या राष्ट्र चिन्हावर आहे. परंतु आमचे राष्ट्रीय नेते धडधडीत खोटी विधाने करून लोकांची दिशाभूल करीत असतात. सत्य हे बचावाचे कारण होऊ शकत नाही असे काही दिवसांपूर्वी सर्वोच्च न्यायालयाने एका केसमध्ये निकालांत म्हटलं होते. मग प्रश्न असा येतो की न्यायालयात साक्षीदारांकडून अगोदर धर्म ग्रंथावर हात ठेवून घेण्यात येतो त्याला काहीच अर्थ राहत नाही. का सत्य दोन प्रकारची आहेत ? सामाजिक कायदे नितीमूल्यांवर आधारित असतात. त्यापैकीच सत्य हे फार महत्त्वाचे त्याचीच अशी पायमल्ली केली तर कसे चालेल ? म्हणून प्रत्येक वकीलाने सत्याची बाजू धरूनच केस लढविली पाहिजे आणि न्यायधिशानेही सत्यालाधरूनच निकाल दिले पाहिजे. अशी शपथ घेऊनही जर साक्षीदारने खोटी साक्ष दिली आहे असे आढळून आले तर त्यास कडक शिक्षा झाली पाहिजे आणि तशीच वकिलालाही.

**धर्म आणि विज्ञान**

बुद्धीच्या आणि विज्ञानाच्या कसावर धर्म उतरेल काय ? आज जगात विज्ञानाच्या जोरावर मानवाने फारच

प्रगती केली आहे. मानव चंद्रावर पाय ठेवून आला आहे. उद्या दुसऱ्या ग्रहावर ही तो जावून उतरेल. बुद्धीच्या आणि विचाराच्या कक्षा वाढल्या आहेत. त्यामुळे प्रत्येक गोष्ट आजच्या पिढीला बुद्धीला पटेल तरच ग्राह्य वाटते. धर्म हा अंधश्रद्धेवर आधारलेला आहे असं त्यांना वाटते. त्यामुळे धर्मावरील विश्वास उडत चालला आहे. 'बाप दाखव नाही तर श्राद्ध कर' अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. श्रद्धा नाही मग आम्हाला कोणतेच बंधन नको मुक्त संचार हवा. पैशाने सर्व गोष्टी साध्य होतात तुमच्या श्रद्धेला आणि दगडाच्या देवाला विचारतो कोण ? परंतु विज्ञान आणि धर्म अध्यात्म हे परस्परावलंबी आहेत. जो विश्वाचे धारण करतो तोच धर्म. धर्म मानवी जीवनाशी निगडीत आहे. हिंदू धर्म हा मानवी मूल्यांवरच आधारलेला आहे. संबंध विश्वातील मानवांच्या कल्याणाकरिता झटत आला आहे. हिंदू धर्मीयांनी दुसऱ्या कोणत्याही धर्मावर आक्रमण केलेले नाही. वा त्यांचा छळ केलेला नाही. आपल्या सनातन धर्मतत्वांचाच म. गौतमबुद्धाच्या तत्त्वज्ञानावर प्रभाव पडला होता. तसेच पाश्चात्य देशातील 'मॅक्समुलर' सारख्या पंडितांवर सुद्धा पडला आणि त्यांनी तत्त्वज्ञानाच्या आणि मानसशास्त्राच्या क्षेत्रात क्रांती घडवून आणली. पुढे हळूहळू हेच दैवी तत्त्वज्ञान इतर धर्म प्रचारकांनी सुध्दा मानव जातीच्या कल्याणा करिता उपयोगात आणले आणि अशा तऱ्हेने त्याचा आज सर्व जगात प्रसार होत आहे. परंतु सर्व धर्मात मानवतेलाच महत्त्व दिलेले असते असे नाही तर प्रचाराला व धर्मपरिवर्तनाला ही महत्त्व असते हिंदू धर्मच मानवता व सहिष्णुतावादाची शिकवण देतो. अनादि कालापासून आमच्या ऋषीमुनींनी वेद-उपनिषदे द्वारा हेच केलेले आहे. हिंदू धर्मात आचरणाला पूर्ण स्वातंत्र्य आहे कोणाही व्यक्तिवर कोणत्याही धर्म गुरूंची उपासने बाबत व देवते बाबत सक्ती नसते ज्याला ज्या तऱ्हेने पाहिजे असेल त्या पद्धतीने त्याने भक्ती-आराधना साधना करावी. त्या करिता आपल्या दैवतांचीही संख्याही भरपूर आहे. हिंदूंनी परधर्मीयांबद्दल कधीच अनादर दाखविला नाही व कोणाचाही द्वेष करण्यास शिकवले नाही. जेव्हा हिंदूंना आश्रय दिला त्याचाच परिणाम म्हणजे अद्याप आपल्याकडे मलबारी लोक आहेत. म्हणजेच मोपले आणखी एका कालखंडात पारशी जमातीची जेव्हा पर्शियात नायनाट होण्याची वेळ आली होती तेव्हा शिल्लक राहिलेले पारशी भारतात आले त्यांना हिंदूंनीच आपले म्हणून स्वीकारले. आजही ते लोक कैक पिढ्यापासून आपला धर्म संभाळून मोठमोठ्या शहरांतून आनंदाने रहात आहेत. तसेच ख्रिस्ती लोकांनाही भारतात पूर्ण धर्मस्वातंत्र्य आहे. अद्याप ते भारतातच राहून आपले धर्म स्वातंत्र्य उपभोगत आहेत. हिंदू धर्माची ही सहिष्णुवृत्ती पूर्वीपासून आहे ती आजही कायम आहे या पुढे राहिल. जेव्हा माणसाची बुद्धी प्रगल्भ होते, तो विचाराच्या सर्वोच्च अवस्थेप्रत पोहोचतो तेव्हा त्याच्या ठिकाणी स्त्री-पुरुष, गरीब-श्रीमंत, वर्ण-जात, धर्म-संप्रदाय इत्यादिकांचे भेद रहात नाहीत. ह्या भेदांच्या पलिकडे जाऊन तो स्थितप्रज्ञ पोहोचतो तेव्हा त्याला ब्रम्हाचा साक्षात्कार होतो. तो योगी होतो आणि विश्वबंधुत्वाची नाते जोडतो हे फक्त हिंदुधर्मांचेच तत्वज्ञान आहे ते आपल्या योगी पुरुषांनी आत्मसात केलेले आहे.

आपला भारत सदैव धर्मप्रधान देश राहिला आहे. आज सर्वजगात भारतीय हिंदू तत्त्वज्ञानाचा प्रभाव स्वामी विवेकानंद, योगनंदापासून चालू झाला तो कायम आहे व झपाट्याने पसरत आहे. कारण आपले अध्यात्मिक तत्त्वज्ञान जीवनाला उपयोगी आहे आणि माणसाला माणुसकीने जगायला शिकविते. कारण धर्मच मानवांचे, धारण, पोषण, संरक्षण करतो. व्यक्तिचे आचरण उच्च व आदर्श असेल तर समाजही आदर्श बनतो कारण व्यक्तिंचाच समाज बनतो. धर्महीन समाज उच्छृंखल बनतो आणि मग सर्वनाश व्हायला वेळ लागत नाही.

ईशावास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यां जगत्
त्येन व्यक्तेन भुंजीथा मा गृधः कस्यचिध्दनम्।



या जगात जे काही आहे ते सर्व ईशतत्त्वाने भरलेले आहे. या संसाराचा उपभोग त्यागभावनेनेच करावा आणि कधीही कोणाच्या धनाचा अगर संपत्तीचे अपहरण करू नका. हे किती महान तत्त्वज्ञान आपल्या धर्मात आहे. हिंदु धर्माच्या उगमाशी आपण जर गेलो तर आपल्याला आढळेल की आपले वेद अपौरुषेय आहेत असे म्हणतात. म्हणजे प्रत्यक्ष भगवान नारायणाचे मुखांतून आलेले आहेत असे म्हणतात. म्हणजे प्रत्यक्ष भगवान नारायण स्वरुपच आहेत. वेद, श्रुती, उपनिषदे व कर्म, ज्ञान, उपासना हे तीन काण्ड आणि चार पुरुषार्थ हे सृष्टीतील सर्व मानव जातीतील लोकांना सुखशांती लाभावी त्यांचे कल्याण व्हावे आणि सर्वांना सुख आनंदाची प्राप्ती व्हावी ह्या साठीच आहेत म्हणून कृण्वन्तो विश्वमार्यम् असे आपल्या ऋषीमुनींचे ध्येय होते नंतर होवून गेलेल्या संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पसायदानाचाही तोच अर्थ आहे. म्हणून कोणत्याही धर्मात निती नियमांच्या आचरणावर जास्त भर असतो. परंतु आपल्याला याचा विसर पडला आणि कर्म कांडाला जास्त महत्त्व दिले गेले. म्हणून दिवसेंदिवस नितीमूल्यांची घसरण होऊन माणुसकी लोप पावत चालली आहे. व सर्वत्र गुन्हेगारी प्रवृत्ती माणसेच दिसत आहेत. अशीच माणसे आज आपल्यावर आज राज्य करीत आहेत. म्हणून सदाचाराने मानवधर्माचे सर्वांनी पालन करावे.



Jyotirlinga Temple, Trimbakeshwar (Nasik)

**गो. रा. जोशी**
निवृत्त पर्सनेल ऑफिसर, मध्य रेल्वे.
(निवृत्त एकात्मता दिन स्मरणिके वरून साभार !)

***

# कॉलेज डे

*कॉलेज मध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पिढ्या सातत्याने बदलतात. काळाबरोबर धावणारी ही मुलं पाहून पुढील पिढीतील मनात काय विचार येतील त्याचा अंदाज या लेखातून यावा. - संपादक*

बरेच दिवसांनी मुलुंडला कझिनकडे गेलो व तेही सकाळी सकाळीच. भाऊ लेटेस्ट कपडे (फाटलेली जीन, विचित्र मजकूर लिहिलेला टी शर्ट, गॉगल, जाडजूड बूट) घालून कॉलेजमध्ये निघाला होता. 'येतोस का कॉलेजमधे टाईम पास करायला ?' हा प्रश्न सोडून मला विशेष धक्का बसला नाही पण कॉलेजमध्ये काय बघायला मिळणार याची आयडिया मात्र आली. म्हटलं, चला जाऊ या ! त्याच्या बाईकवरून सुसाट कॉलेजमध्ये पोचलो. भावाने एक-दोन मुला-मुलींना हाय ! वगैरे करून, त्यांच्याबरोबर 'लेटेस्ट झिम्मा' खेळून (हाय ! म्हटल्यावर अस करायचं असत) माझी ओळख करून दिली. माझ्या एकंदर अवतारावरून मी एक जुन्या पिढीतला कोणीतरी निरुपद्रवी प्राणी आहे अशी त्यांची समजूत झाली असावी.

जरा वेळ नोटीस बोर्ड बघून आम्ही तडक कँटीनमध्ये गेलो. (पूर्वी आम्ही तडक 'लायब्ररीत' जायचो) तिकडे भावाची वाट बघत एकदोन जण बसले होतेच. लगेच लेटेस्ट झिम्मा (हा झिम्मा खेळण्याचा प्रकार दर सहा महिन्यांनी बदलतो म्हणे !) खेळून, व्हाय सो लेट ? इ. डायलॉग मारून परत एकदा ओळखीचा कार्यक्रम झाला. जरा वेळ 'वडापाव' (डबलरोटी आणि कच्ची दाबेली) कार्यक्रम झाल्यावर हळूहळू इतर मुले माझ्या उपस्थितीला सरावली, त्यांच्या नेहमीच्या गप्पा सुरु झाल्या. रोज कोणता ना कोणता तरी 'डे' होताच. काल 'रोझ डे', आज 'टाय डे' तर उदया 'पेन डे' '(एखादा दिवस 'स्टडी डे' पण असावा असा विचार मनात आला) मला कॉलेज संपूर्ण बघायचय असं म्हटल्यावर त्याना आश्चर्यच वाटलं. कँटीन व नोटीस बोर्ड सोडून कॉलेजमध्ये काय बघायचय ? असा भाव त्यांच्या चेहेऱ्यावर होता. शिवाय कँटीनमधून उठायच सर्वांच्या जीवावर आलं होत.

भावाची 'मराठी' मैत्रीण एकदम टीपटॉप. लिपस्टीक, बॉबकट आणि मिनी घालून 'अधूनमधून' मराठीतून बोलत होती. आजची राजकीय परिस्थिती, सामाजिक मूल्ये इ. बाबत बोलायला ती फार नाराज दिसली. पुढे काय करणार ? या माझ्या प्रश्नावर पैसे कमवणार व त्यासाठी 'एअर होस्टेस'च होणार अस तिने ठणकावून सांगितले. तिच्यातील आत्मविश्वास बघून मला तिचं फार कौतुक वाटलं. 'यात काय विशेष ? जॅक लावला की झाल काम' अस म्हणून तिने हा प्रश्न फारच सोपा असल्याच सुनावल. कँटीनमध्ये काही मुलेमुली जोडीने बसली होती. त्याबद्दल विचारता तिने मला एक जोरदार 'खुन्नस' दिला. मागच्या बाकावर 'नॉन व्हेज' जोक्सना ऊत आला होता. हे जोक्स कुणी 'मॅडमच' वर्गात सांगतात असं नंतर कळल. एका कोपऱ्यात अंताक्षरी तर दुसऱ्या कोपऱ्यात विविध 'सिरीयल्स' वर चर्चा चालू होती. कोण किती मुलींबरोबर फिरतो व कोण किती 'फेमस' आहे यावर कँटीनमध्ये वादविवाद चालू होताच. जी काही दोनचार मुले डवा खातखात 'नोटस् उतरवून घेत होती, त्यांच्याकडे 'उगीच जागा अडवून बसतात' या दृष्टीने बघीतलं जात होत.

नंतर संपूर्ण कॉलेज फिरण्याचा कार्यक्रम झालाच. कॉलेजचं एकंदर बदलेल स्वरूप, मिळणाऱ्या निरनिराळ्या सवलती, विविध प्रकारचे कार्यक्रम, योजना इ. बाबत एकूण

ही पिढी फारच लकी आहे असे वाटले. तेवढ्यात एक 'शेपटा' घातलेल्या मुलाने ''हाय धनु ! मग टिपीवर भेट' अस म्हणून जोरदार 'लेटेस्ट' झिम्मा केला. माझ्या ताणलेल्या भुवया बघून भावाने स्पष्टीकरण दिल की हा मुलगा 'पॉप गाणी गातो (म्हणून शेपटा). कॉलेजच्या बाहेर एक पडलेलं झाड, ट्री पॉइंट (टिपी), हा यांचा मिटींग पाईंट आहे. भावाने लायब्ररी दाखवायला नकार दिला कारण त्याला मग अभ्यासासाठी आठवण होते व 'टेन्शन' येत.

नंतर पश्चिमेला दुसऱ्या कॉलेजमध्ये जाण्याचं ठरलं. मार्केटमधून सुसाट जाताना सारखी देवाची आठवण येत होती. तिथे पोहोचल्यावर तर दोन मिनिटे काय चाललय हेच कळेना. प्रचंड गर्दी व मधल्या वर्तुळात एक विद्यार्थी शेरोशायरी करत एका कॉलेज क्वीनच कौतुक करत होता. (पूर्वी कॉलेज क्वीन एकच असायची, आजकाल भरपूर. तेवढ्यात दुसऱ्या भावाने आम्हाला बघितलं व 'मॉडेलींग' उर्फ 'फॅशन शो' ची स्पर्धा चालू आहे अस सांगितल. अति आधुनिक कपडे घालून एकएक विद्यार्थिनी स्टेजवर येत होती व स्वत:भोवती गोलगोल फिरुन 'सुंदर मी होणार' या थाटात एकदम मुरडत होती (अर्थात पॉप म्युझिकच्या तालावर). 'मुलींचे पाय पाळण्यात दिसतात ऐवजी मुलींचे पाय कॉलेजात वाकडे पडतात' अस म्हणावस वाटत. सर्व प्रोफेसर, विद्यार्थी व नोकरचाकर मंडळी कार्यक्रमाला उत्तम प्रतिसाद देत होती (का नाही देणार?) मी बाजूला असल्याने भावाला मात्र थोड 'ऑकर्ड' वाटत होतं. (एरवी फारच 'फॉरवर्ड' आहे.)

कार्यक्रम संपला व हळूहळू गर्दी पांगली. जो तो एखाद्या पार्टीला, सिनेमाला, किंवा मित्राकडे कॉम्प्युटर गेम खेळायला जायच्या घाईत होता ! परत एकदा सर्वांबरोबर लेटेस्ट झिम्मा खेळून आम्ही कॉलेजच्या बाहेर पडलो. मनात एकच विचार आला की हल्लीच्या मुलांना काहीतरी वेगळ व उत्तुंग करून दाखवायचय, त्यांच्यात जिद्द आहे, मेहनत करण्याची तयारी आहे पण यासाठी योग्य दिशा दाखवणारे पालक, शिक्षक व पुढारी यांच्या नशिबात आहेत का की ही भ्रष्ट होत चाललेली आपली समाजव्यवस्था यांनासुध्दा गिळकृंत करेल ? अखेर एका विनोदी लेखकाने लिहिलेल्या चार ओळी आठवतात. तो म्हणतो -

In college, some pepople persue to learn, But at the same time, Some of them learn to persue.

भालचंद्र रा. गोखले
वेडेकर सदन, मोगल लेन
माहीम, मुंबई.

• • •



# परिसर वार्ता

महाविद्यालय परिसरातील थोरले बाजीराव पेशवे सभागृहात १० फेब्रुवारी विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने औद्योगिक क्षेत्रातील काही निमंत्रितांशी वार्तालापाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. नवीन तंत्रज्ञानामुळे उभी राहणारी आव्हाने पेलण्याच्या दृष्टीने शिक्षण संस्था व औद्योगिक क्षेत्र एकमेकांच्या सहकार्याने नवीन अभ्यासक्रम राबवून विद्यार्थ्यांना अधिक संधी कशा देऊ शकतील या संदर्भात विचार करण्याच्या दृष्टीने सदर सभेचे आयोजन करण्यात आले.

विद्या प्रसारक मंडळाच्या प्रगत अभ्यास संस्थेचे मानद संचालक डॉ. गो. वि. कुलकर्णी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी आजच्या काळाच्या संदर्भात उद्योग क्षेत्र व शिक्षण संस्थांनी एकत्रित विचार करण्याची गरज स्पष्ट केली. संगणकावरील चौकटींच्या साहाय्याने त्यांनी संस्थेचा उपस्थितांना परिचय करून दिला. यानंतर विविध उद्योग समूहांच्या प्रतिनिधींनी आपले विचार स्पष्ट केले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या अध्यक्षीय भाषणाने सभेचा समारोप झाला.

सदर सभेस महाविद्यालय परिसरातील काही प्राध्यापक, संस्था प्रमुखांसमवेत विद्या प्रसारक मंडळाचे कार्यवाह श्री. उत्तमराव जोशी, कोषाध्यक्ष श्री. मा. य. गोखले उपस्थित होते.

**डॉ. टेकाळे अमेरिकेस रवाना :**

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या वनस्पतिशास्त्र विभागातील, प्रपाठक डॉ. नागेश टेकाळे १७ फेब्रुवारी रोजी जगप्रसिध्द हॉपकिन्स विद्यापीठातील दोन आठवड्यांच्या अभ्यासासाठी जात आहेत. बाल्टिमोर (अमेरिका) येथील सदर हॉस्पिटलमध्ये 'अ' जीवनसत्त्वाच्या संदर्भात अभ्यास करण्याकरिता विद्यापीठाचे त्यांना आमंत्रण आले आहे.



डॉ. नागेश टेकाळे

१९७९ पासून बांदोडकर महाविद्यालयात कार्यरत असणारे डॉ. नागशे टेकाळे यांनी जव्हार-मोखाडा परिसरातील आदिवासी बालकांच्या कुपोषणा संदर्भात बरेच संशोधन केले आहे. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य सी. जी. पाटील व वनस्पतिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अंबिके यांनी अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन :**

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील चरित्र आत्मचरित्रांच्या प्रदर्शनाचे महाविद्यालयाचे प्राचार्य सी. जी. पाटील यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. २४ व २५ जानेवारी रोजी ग्रंथालयाच्या वाचन कक्षात झालेल्या या प्रदर्शनात तीनशे चरित्रे, आत्मचरित्रे प्रदर्शित करण्यात आली होती. उद्घाटन समारंभास महाविद्यालयाच्या पदवी विभागाच्या उपप्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर, कला,वाणिज्य महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे उपस्थित होते.



प्रदर्शनाचे उद्‌घाटन करताना प्राचार्य सौ. जी. पाटील सोबत उपप्राचार्य डॉ. सौ. पेजावर व श्री. मोहन पाठक

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. मोहन पाठक व त्यांचे सहकारी यांच्या मार्गदर्शनाखाली यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयाच्या पदवी वर्गातील विद्यार्थ्यांनी हे प्रदर्शन भरविले होते. प्रदर्शनास महाविद्यालय परिसरातील विद्यार्थ्यांबरोबर विद्याप्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष श्री. श्री. वि. करंदीकर, कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर गावातील अनेक ग्रंथप्रेमींनी भेट दिली.

## डॉ. बेडेकर विद्यामंदिर (प्राथमिक विभाग)

डॉ. बेडेकर विद्यामंदिर प्राथमिक विभागाचे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ शुक्रवारी दि. २१ डिसेंबर २००१ रोजी, संस्थेच्याच 'विद्यालंकार' सभागृहात आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष माननीय डॉ. वा. ना. बेडेकर यांनी भूषविले. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून बालनाट्य लेखिका सौ. रेचल गडकर ह्या उपस्थित होत्या. कार्यक्रमास विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष माननीय श्री. श्री. वि. करंदीकर व इतर मान्यवर सभासद, तसेच पूर्व प्राथमिक विभागाच्या प्रमुख सौ. वैद्यबाई व माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. केळकरबाई इत्यादि. मान्यवर उपस्थित होते.

ईशस्तवन व स्वागत गीताने कार्यक्रमास सुरुवात झाली. त्यानंतर प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनुराधा मळेकर यांनी प्रास्ताविक केले. शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका सौ. कल्याणी बापरे यांनी उपस्थितांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. तसेच माननीय डॉ. वा. ना. बेडेकर ह्यांना यंदाचा 'रुग्णमित्र' पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल प्राथमिक विभागातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. संस्थेचे उपाध्यक्ष श्री. श्री. वि. करंदीकर ह्यांनी वयाची ७५ वर्षे पूर्ण केल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांची ओळख सौ. विजया भंडारे बाई यांनी करून दिली. नंतर शालेय वार्षिक अहवालाचे वाचन सौ. कल्याणी बापरे बाई यांनी केले.

स्नेहसंमेलनाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहिलेल्या सौ. रेचल गडकर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. उपस्थित विद्यार्थ्यांना त्यांनी छोट्या परीची गोष्ट सांगितली. खोटे कधी बोलू नका, मोठ्यांचे ऐका, व प्रयत्न करा म्हणजे जीवनात यशस्वी व्हाल असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांनी शाळेतील विद्यार्थ्यां बरोबरच, प्रमुख पाहुण्यांचे अभिनंदन केले.

यानंतर सन् २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात शालेय अभ्यासक्रमात विशेष प्रावीण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे व कार्यक्रमाचे अध्यक्ष व संस्थेचे उपाध्यक्ष इत्यादि मान्यवरांच्या हस्ते बक्षीसे देऊन गौरविण्यात आले. शाळेतील इयत्ता ४ थी ५चा विद्यार्थी कु. प्रणव प्रभाकर फिरके यास ह्या वर्षाचा आदर्श विद्यार्थी म्हणून भूषविण्यात आले.

पारितोषिक वितरण समारंभानंतर प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. महाराष्ट्रातील श्रेष्ठ प्रसिध्द कवींच्या कविता हा सांस्कृतिक

कार्यक्रमाचा विषय होता. विद्यार्थ्यांना मनोरंजना बरोबरच प्रसिध्द कवींची व त्यांच्या साहित्याची ओळख करून देण्यासाठी काही प्रसिध्द कवितां वरती विद्यार्थ्यांची नृत्य सादर केली. विद्यार्थ्यांना फक्त टी. व्ही., सिनेमा मधील लयबद्ध गाणीच पाठ होतात असे नाही तर कवितांना योग्य चालीची साथ दिली तर त्यातूनही संगीत बहरु शकते व मग मुलांच्या ओठावर या कवितासुध्दा सहज खेळतात हे या कार्यक्रमातून जाणवले. प्रत्येक इयत्तेतील विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात उत्साहाने भाग घेतला.

सांस्कृतिक विभागातील कार्यक्रमांचे परीक्षण करण्यासाठी माध्यमिक विभागातील शिक्षिका सौ. मंजिरी दांडेकर व श्रीम्. आशा जोशी ह्या उपस्थित होत्या.

स्नेहसंमेलना निमित्त विभागातील विद्यार्थ्यांच्या विविध क्रिडा स्पर्धा घेण्यात आल्या. त्याचा पारितोषिक वितरण समारंभ मंगळवार दिनांक २२ जानेवारी २००२ रोजी साजरा करण्यात आला. सकाळ विभागातील विजयी स्पर्धकांना माध्यमिक विभागातील कलाशिक्षिका सौ. मंजिरी दांडेकर यांच्या हस्ते बक्षिसे वाटण्यात आली. केवळ बक्षिसे मिळविण्यासाठी खेळू नका. खेळातून आनंद मिळवा. बक्षिस मिळाले नाही तर घाबरू नका प्रयत्न करा, यशस्वी व्हाल असा संदेश दिला. दुपार विभागातील विजयी स्पर्धकांना माध्यमिक विभागातील शिक्षिका श्रीमती आशा जोशी यांच्या हस्ते बक्षिसे वाटण्यात आली. समारंभात उपस्थित पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना एकजुटीने कार्य करावे, आपापसात भांडू नये तसेच खेळाबरोबरच आहाराचे महत्व पटवून दिले.

स्नेहसंमेलना निमित्त बुधवार दि. २३ जानेवारी २००२ रोजी प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात येऊन वार्षिक स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## अक्षय ठक्करला दुहेरी मुकूट !



अक्षय ठक्कर

ठाण्याचा आघाडीचा उगवता बॅडमिंटनपटू अक्षय ठक्कर याने विजयवाडा (आंध्रप्रदेश) येथे नुकत्याच झालेल्या अखिल भारतीय ज्युनियर राष्ट्रिय स्तरावरील स्पर्धेत एकेरी व दुहेरी अशा दोन्ही गटात अजिक्यपद पटकावून दुहेरी मुकूट संपादन केला.

अक्षय ठक्करने ठाण्याच्याच अमर मोहितेला एकेरीच्या अंतिम फेरीत पराभूत केले ते ४-७, ७-१, ७-४, ७-५ अशा चुरशीच्या चार गेम्सच्या लढतीमधे !

एकेरीच्या उपउपांत्य व उपांत्य फेरीच्या लढतींमधे अक्षय ठक्करने यजमान आंध्रप्रदेशच्या जयन जेम्स व टी. दिनेश या खेळडूंना अनुक्रमे चार व पाच सेटस मध्ये पराभूत केले.

दुहेरीत अक्षय ठक्कर व अमर मोहिते या ठाणेकर जोडीने राष्ट्रीय विजेत्या केरळच्या विनीत मॅन्यूयल व संदीप लुईस या जोडीचा सनसनाटी पराभव करून एकच खळबळ उडवली. हा सामना त्यांनी ७-५,७-४, ७-० असा सहज जिंकला.

अक्षय ठक्कर व अमर मोहिते हे दोघेही आमच्या जोशी बेडेकर महाविद्यालयाचे वाणिज्य शाखेचे विद्यार्थी असून त्यांच्या स्पृहणीय यशाबद्दल प्राचार्य स. वा. गोखले

यांनी त्यांचा खास सत्कार करून अभिनंदन केले.

त्याचप्रमाणे ठाणे शहर व जिल्हा बॅडमिंटन असो. चे अध्यक्ष, खासदार प्रकाश परांजपे यांनी ह्या खेळाडूंचे खास कौतुक केले आहे व या खेळाडूंनी केलेल्या कष्ट व परिश्रमांचे हे फळ असल्याचा खास उल्लेख केला आहे.

अक्षय ठक्कर हा १८ वर्षीय उंचापूरा खेळाडू ठाण्याच्या महापालिकेच्या सय्यद मोदी स्मृती बॅडमिंटन प्रशिक्षण योजनेचा गेली ६ वर्षे प्रशिक्षार्थी असून श्रीकांत वाड व राजीव गणपुले हे त्याचे मार्गदर्शक आहेत.

विजयवाडा येथील ही स्पर्धा १ लक्ष रु. बक्षिस रकमेची महत्त्वपूर्ण राष्ट्रीय स्पर्धा होती. या स्पर्धेतील कामगिरीवरुन हॉलंड व जर्मनी येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धात सहभागी होणारा भारतीय संघ निवडला जाणार असून या दृष्टीने अक्षय ठक्करची कामगिरी लक्षणीय ठरते.

पतियाळा येथे फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात होणाऱ्या राष्ट्रिय शालेय बॅडमिंटन स्पर्धेसाठी ५ बॅडमिंटनपटूंचा महाराष्ट्राचा संघ जाहीर झाला असून त्यापैकी ३ खेळाडू ठाण्याचे असून उर्वरीत २ खेळाडू ही ठाण्यातच बॅडमिंटन प्रशिक्षण घेणारे आहेत.

१७ वर्षाखालील मुलांच्या ह्या संघात पुढील खेळाडूंचा समावेश आहे. अभिनव कपूर, अमीत खडगी, पवनसिंग, रोहित नारके, अमेय जोशी या संघात निवड होण्यासाठी पुणे येथे खेळाडूंची निवड चाचणी घेण्यात आली.

या संघ निवडीबद्दल ठाण्याच्या सय्यद मोदी बॅडमिंटन प्रशिक्षण योजनेचे प्रमुख प्रशिक्षक श्रीकांत वाड यांनी समाधान व्यक्त केले असून खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**प्रा. मोहन पाठक**

• • •

## केबल टी. व्ही. नको रे बाबा !

१) गोंधळ आवाज आणि कलहामुळे होणारे दुष्परिणाम.

२) Show-business कृत्रिमपणा याला जास्त महत्त्व.

३) शाळा/कॉलेजमध्ये आणि एकुणच शिक्षणात कमी लक्ष.

४) रागीटपणा वाढणे, कपटीपणाकडे जास्त लक्ष.

५) शरिरावर अवास्तव ताण पडतो. दूरदर्शन बघताना सारखं बघंण कराव लागतं. दूरदर्शन बघीतल्यावर आळसावल्यासारखे होते. इतर कामांचा घोटाळा..

६) माणसामाणसांतील दरी मोठी होत आहे. दुसऱ्याकडे नेहमी संशयाने बघीतले जाते.

७) कुटुंबातील माणसं एकमेकांना दुरावत चालली आहेत. आपापसात गप्पा मारत जेवण करण्यापेक्षा, दूरदर्शनवरील तणावग्रस्त प्रसंग (रचलेले) बघत वाटेल ते पोटात ढकलण्याकडे कल. आपले पालक, मित्र, नातेवाईक यांच्यावरल जिव्हाळा नाही.

८) दूरदर्शनमुळे अनेक प्रकारच्या दुष्ट प्रवृत्ती वाढीस लागतात. पाप करण्याकडे कल जास्त. वयस्कर माणसाना अपमानास्पद वागणुक.

९) फसवेगिरी, एकमेकाना टोमणा घालणे, मैत्रिणींची छेडछाड करणे, घरातील पैसे चोरणे इ. गोष्टी करताना अपराधीपणाची भावना मनात नसते.

१०) कुठलीही गोष्ट सहज शक्य आहे आणि कुठल्याही गैरमार्गाने ती मिळवायची असते असा समज.

११) सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे अप्रत्यक्षपणे आरोग्यावर ताण पडतो. तसेच वेळ अक्षरशः फुकट घालवणे. त्यांचा कोणी विचारच करीत नाही.तेव्हा मंडळी दूरदर्शनचे 'दुरून' दर्शन घ्या. आपला अमूल्य वेळ फुकट घालवू नका.

**श्री. भालचंद्र रा. गोखले,**
बेडेकर सदन, माहीम, मुंबई.

# कसं वागावं...

केवळ आपल्या स्वार्थासाठी कलह नसावा घरामध्ये।
आपुलकीच्या नात्या मधूनी स्नेह जपावा मनामध्ये ॥ धृ ॥

येणाऱ्याला पाणी द्यावे मुखात वाणी गोड हवी।
जाणाऱ्याला मनात फिरूनी येण्याविषयी ओढ हवी।
ऐसा प्रेमळ माणुसकीचा झरा वहावा मनामध्ये ॥ १ ॥

भांड्याला लागतेच भांडे विसरून जावे क्षणामध्ये।
परस्परांना समजून घ्यावे अढी नसावी मनामध्ये।
रुसवे फुगवे नको फुकाचे मोद रहावा मनामध्ये ॥ २ ॥

नित्य काळजी घरात घ्यावी वय झालेल्या पानांची
ज्याची त्याला द्यावी जागा वयाप्रमाणे मानाची।
एकमताने निर्णय घ्यावा नको दुरावा मनामध्ये ॥ ३ ॥

लळा जिव्हाळा आत असावा नको उमाळा वरकरणी।
नको घराला गर्व धनाचा लीन रहावे प्रभुचरणी।
दिवसा राती परमेशाचा वास असावा घरामध्ये ॥ ४ ॥